पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २०५ ■ रविवार, दि. १ फेब्रुवारी २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

Dr. Ravi V. Ganeshkar
M.B.B.S., M.S. (ENT)
Fellow Head & Neck Oncosurgery
फेलो हेड अँड नेक ऑंकोसर्जरी
थायरॉइड सर्जरी आणि संबंधित थायरॉइड कॅन्सरचे विशेषज्ञ
मास्टर ऑफ सर्जरी, नाक, कान, गला संबंधित कर्करोग तज्ञ
Mob : 0721-2571357, 9326609901
Address: Gete Life Hospital, Near Maratha Friends, Vijay Colony, 19 No. School Beside, Rukhmini Nagar, Amravati

# आत्मनिर्भर भारत हेच लक्ष्य !

वृत्तसंस्था १ फेब्रुवारी

**नवी दिल्ली :** केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आर्थिक विकास दरात वाढ हे सरकारचे पहिले कर्तव्य असल्याचे सांगितले आहे. गेल्या १२ वर्षांपासून नियोजनबद्ध विकास सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले. सरकारचा प्रमुख भर कृषी क्षेत्रात उत्पादकता वाढवण्यावर आहे, ज्यामुळे आत्मनिर्भर भारत हे लक्ष्य साध्य करता येईल. देशांतर्गत उत्पादन वाढवण्यावरही विशेष लक्ष दिले जात आहे.

सीतारमण यांनी लोकांच्या इच्छा आकांक्षा पूर्ण करणे आणि त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्न करणे हे आपले कर्तव्य असल्याचे स्पष्ट केले. गरिबांचे कल्याण करण्यावर सरकारचा सतत भर राहिला आहे. गुंतवणूकीला प्रोत्साहन देण्यासाठी प्रयत्न सुरू असून, भारताला बायोफार्मा उत्पादनाचा जागतिक हब बनवण्याची सरकारची महत्त्वाकांक्षी योजना आहे. यासाठी १० हजार कोटींची तरतूद करण्यात आली आहे. आयातीवरील अवलंबित्व कमी करणे आणि रचनात्मक सुधारणा करणे हे सरकारचे उद्दिष्ट आहे. त्याचबरोबर कॅन्सर आणि मधुमेहावरील औषधे स्वस्त करण्यावरही भर दिला जाणार आहे. आर्थिक विकास वाढवणे हे सरकारचे मुख्य कर्तव्य असून, त्या दिशेने सातत्याने कार्य सुरू असल्याचे सीतारमण यांनी सांगितले.

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण ह्या मोदी ३.० सरकारच्या कार्यकाळातील तिसरा अर्थसंकल्प सादर करत आहेत, तर अर्थमंत्री म्हणून हा त्यांचा नववा अर्थसंकल्प आहे. लोकसभेत अर्थसंकल्प भाषणाची सुरुवात करताना निर्मला सीतारमण म्हणाल्या की, आपण खूप लवकरच जगातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनणार आहोत. सरकारचा मुख्य फोकस गरीब आणि शेतकऱ्यांच्या समृद्धीवर राहिला आहे. यासोबतच रोजगार निर्मितीच्या दिशेने काम करत असून, असे निर्णय घेतले जात आहेत जे वाढीला (ग्रोथ) आधार देत आहेत. याचा परिणाम भारताच्या जीडीपीवर दिसतो आहे आणि ती ७ टक्क्यांपेक्षा जास्त राहिला आहे. आम्ही घरगुती निर्यात वाढवण्याचे काम केले आहे आणि जागतिक बाजारपेठेत आपली पोहोच वाढवली आहे.



## काय स्वस्त होणार?

- ◆कपडे
- ◆चामड्याच्या वस्तू
- ◆सिंथेटिक पादत्राणे
- ◆चामड्याचे उत्पादने
- ◆१७ कर्करोग आणि मधुमेहावरील औषधे शुल्कमुक्त
- ◆लिथियम-आयन पेशी
- ◆मोबाइल बॅटरी स्वस्त होणार
- ◆सौर ग्लास स्वस्त होणार
- ◆मिश्र वायू सीएनजी
- ◆ईव्ही
- ◆मायक्रोवेव्ह ओव्हन
- ◆विमान इंधन
- ◆परदेश प्रवास

## काय महागणार?

- ◆दारू
- ◆भंगार
- ◆खनिजे

## शेअर बाजाराचा घात

सुट्टी असूनही रविवारी शेअर बाजार २३७०.३६ अंकांपेक्षा जास्त घसरला, ज्यामुळे गुंतवणूकदारांचे १० लाख कोटींहून अधिक नुकसान झाले. विशेष कर (एसटीटी) मध्ये वाढ आणि शेअर बायबॅकवरील कराच्या अर्थसंकल्पातील घोषणेमुळे शेअर बाजारातील लक्षणीय घसरणीला हातभार लावला. गुंतवणूकदार ज्याची आतुरतेने वाट पाहत होते तो २०२६ च्या अर्थसंकल्पाचा दिवस दलाल स्ट्रीटसाठी 'ब्लॅक संडे' बनला. सरकारने फ्युचर्स मार्केटमध्ये व्यापार करणाऱ्या गुंतवणूकदारांना मोठा धक्का दिला आणि एसटीटी शुल्कात वाढ करण्याची घोषणा केली आहे.

## आयकर कायद्याबाबत मोठी घोषणा!

◆नवीन आयकर कायद्याअंतर्गत १ एप्रिलपासून नवीन आयकर फॉर्म जारी करणार असल्याचे सांगितले. याशिवाय आता सुधारित आयकर रिटर्न भरण्यासाठी अधिक वेळ उपलब्ध मिळेल, तर आयकर रिटर्न नाममात्र शुल्कासह दाखल करता येतील. ऑडिट नसलेल्या व्यावसायिक संस्था आणि ट्रस्ट ३१ ऑगस्टपर्यंत रिटर्न दाखल करू शकतील. अनिवासी भारतीयांकडून स्थावर मालमत्तेच्या विक्रीवरील टीडीएस रहिवासी खरेदीदाराकडून कापला जाईल, तर पूर्वी टीएएन आवश्यक होता.

◆अर्थमंत्र्यांनी मोटार अपघात दावे न्यायाधिकरणांनी दिलेल्या निवाड्यांना प्राप्तिकरातून सूट देण्याचा सरकार प्रस्तावित केला. अर्थमंत्र्यांनी सांगितले की, निकाल काहीही असो पहिल्या अपीलीय अधिकाऱ्यासमोर अपील करण्याच्या कालावधीसाठी दंडाच्या रकमेवर कोणतेही व्याज आकारले जाणार नाही. परदेशी टूर पॅकेजेसच्या विक्रीवरील कर संकलन दर अनुक्रमे मागील ५टक्के आणि २० टक्के वरून २ टक्केपर्यंत कमी करण्यात आला आहे.

## मुंबईत इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजी!

भारतातील ॲनिमेशन, व्हिज्युअल इफेक्ट्स, गेमिंग आणि कॉमिक्स (AVGC) क्षेत्र झपाट्याने वाढत आहे. यात २०३० पर्यंत २० लाख व्यावसायिकांची आवश्यकता असेल. त्यामुळे १५,००० माध्यमिक शाळा आणि ५०० महाविद्यालयांमध्ये AVGC कंटेंट क्रिएटर लॅब्स स्थापन करण्यात येईल. त्याशिवाय मुंबईत इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजी बनवण्यात येईल अशी घोषणा केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी अर्थसंकल्पीय भाषणात केली आहे.

## महाराष्ट्राची रेल्वे बजेटमधून निराशा

भारतीय रेल्वेसाठी अत्यंत महत्त्वाकांक्षी घोषणा करण्यात आल्या असल्या तरी महाराष्ट्राच्या वाट्याला काय आले हा प्रश्नच आहे. देशातील दळणवळणाचा वेग वाढवण्यासाठी केंद्र सरकारने ७ नवीन हाय-स्पीड रेल कॉरिडॉर विकसित करण्याचा निर्णय घेतला आहे. यात केवळ मुंबई, पुणे यांसारख्या प्रमुख शहरांमधील प्रवासाचे अंतर तासाभराच्या प्रवासात पूर्ण होणार आहे, एवढाच काय तो दिलासा.

## अर्थसंकल्प सादर करण्याचा विक्रम

अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी आज मोदी सरकारचा अर्थसंकल्प सादर केला. हा त्यांचा सलग नववा केंद्रीय अर्थसंकल्प आहे. या अर्थसंकल्पासह त्यांनी एक विक्रम प्रस्थापित केला आहे. त्या सलग नवव्यांदा देशाचा अर्थसंकल्प सादर करणाऱ्या जगातील पहिल्या महिला अर्थमंत्री बनल्या.

## अर्थमंत्र्यांच्या बजेट भाषणातील १० मुद्दे

- ◆हे युवाशक्तीचे बजेट आहे, ज्यात शेतकरी, गरीब आणि सामान्य माणसाला केंद्रस्थानी ठेवले आहे.
- ◆महसूल तूट कमी करण्यावर सरकारची भर राहिली आहे.
- ◆उत्पादकता वाढवणे, जागतिक अनिश्चिततेचा सामना करणे, सर्वांचा विकास आणि सर्वांना सोबत घेणे यावर काम करणे.
- ◆पायाभूत सुविधा वाढवणे आणि एकत्रित करणे यावर लक्ष केंद्रित केले आहे. रोजगार निर्मिती आणि व्यापार सुधारणांवर भर.
- ◆सार्वजनिक गुंतवणुकीवर सरकारचा फोकस आहे. आर्थिक वाढ तीन प्रमुख उद्दिष्टांवर केंद्रित आहे.
- ◆ईएसएम पीएलआय योजनेची तरतूद ४० हजार कोटी रुपये करण्याचा प्रस्ताव.
- ◆ तमिळनाडू, केरळ आणि आंध्र प्रदेशात रेअर अर्थ मिनरलसाठी कॉरिडॉर तयार केले जातील.
- ◆एमएसएमई ग्रोथ फंडसाठी १०,००० कोटींची तरतूद करण्यात आली आहे.
- ◆आयएसएम२.० ची सुरुवात करत आहोत. यामुळे सेमीकंडक्टर उत्पादन वाढेल.
- ◆इलेक्ट्रॉनिक्स मॅन्युफॅक्चरिंगसाठी ४० हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

## जेथे निवडणुका तिथेच घोषणांचा पाऊस!

यंदा पश्चिम बंगाल, आसाम, तमिळनाडू, पुदुचेरी आणि केरळ या राज्यांमध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत. केरळ वगळता इतर चार राज्यांमध्ये मार्च किंवा एप्रिलमध्ये निवडणुका होऊ शकतात. हे लक्षात घेऊन या राज्यांसाठी अर्थमंत्र्यांनी अनेक प्रकल्पांची घोषणा केली आहे. ओडिसा, तमिळनाडू आणि आंध्र प्रदेशात समर्पित मिनरल पार्क बांधली जातील. याशिवाय, वाराणसी ते सिलीगुडीपर्यंत रेल कॉरिडॉर तयार करण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. तसेच, केरळ आणि तमिळनाडूसह इतर राज्यांमध्ये रेअर अर्थ कॉरिडॉर तयार करण्याची घोषणा केली आहे.

## सेमी कंडक्टरमध्ये भारताचा 'मास्टरस्ट्रोक'!

आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या युगात भारताला जागतिक स्तरावर 'टेक पॉवरहाऊस' बनवण्यासाठी केंद्र सरकारने कंबर कसली आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी आज सादर केलेल्या २०२६-२७ च्या अर्थसंकल्पात देशाच्या सेमीकंडक्टर परिसंस्थेला बळकट करण्यासाठी ४०,००० कोटी रुपयांच्या भरीव निधीची घोषणा केली आहे. यासोबतच, भारताला चिप उत्पादनाचे केंद्र बनवण्यासाठी 'इंडियन सेमीकंडक्टर मिशन २.०' लॉंच करण्याचे जाहीर केले आहे. सेमीकंडक्टर क्षेत्रातील ही गुंतवणूक केवळ आर्थिक तरतूद नसून, भारताच्या 'हाय-टेक' भविष्याचा पाया आहे.

# केंद्राच्या अर्थसंकल्पातून महाराष्ट्राला मोठा फायदा; विकास प्रकल्पांना गती – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



### महत्त्वाच्या तरतुदी

| | |
|---|---|
| ग्रामीण रस्ते प्रकल्पासाठी | ३७८ कोटी |
| ॲग्री-बिझनेस नेटवर्कसाठी | १६७ कोटी |
| मेडिकल एज्युकेशन विकासासाठी | ३८५ कोटी |
| ॲग्री-बिझनेस ट्रान्सफॉर्मेशनसाठी | ६४३ कोटी |
| अप्लाइड नॉलेज व कौशल्य विकासासाठी | ३१३ कोटी |
| जिल्हा संस्थात्मक क्षमता वाढीसाठी | २४० कोटी |

प्रतिनिधी १ फेब्रुवारी

**मुंबई :** केंद्र सरकारच्या नव्या अर्थसंकल्पातून महाराष्ट्राला मोठ्या प्रमाणात आर्थिक लाभ होणार असून विविध विकास योजनांना यामुळे गती मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

लोकसंख्या, औद्योगिक क्षमता आणि कृषी क्षेत्र लक्षात घेऊन राज्यासाठी महत्त्वाच्या तरतुदी करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. विविध घटक गटांसाठी पुढील पाच वर्षांत प्रत्येकी पाच हजार कोटी रुपयांची तरतूद करण्याचा कार्यक्रम आखण्यात आला आहे. कृषी, ॲग्री-बिझनेस, मेडिकल एज्युकेशन, ग्रामीण रस्ते आणि औद्योगिक इकोसिस्टम मजबूत करण्यावर भर देण्यात आला असून त्याचा महाराष्ट्राला थेट फायदा होणार आहे.

केंद्राच्या वाटप सूत्रानुसार यंदा महाराष्ट्राला सुमारे ९८ हजार कोटी रुपयांहून अधिक निधी मिळण्याची अपेक्षा आहे. मागील वर्षाच्या तुलनेत किमान १५ हजार कोटी रुपयांनी अधिक निधी मिळेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

याशिवाय मुंबई–अहमदाबाद हायवे कॉरिडॉर, मुंबई मेट्रो विस्तार, ग्रीन मोबिलिटी, महामार्ग सुरक्षा आणि औद्योगिक पायाभूत सुविधांसाठीही मोठी तरतूद करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.मुंबई–पुणे–पश्चिम महाराष्ट्र तसेच मराठवाडा आणि विदर्भालाही या प्रकल्पांचा लाभ होणार असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. 'विरोधक महाराष्ट्राला काही मिळाले नाही असा आरोप करत असले तरी प्रत्यक्षात विविध योजनांमधून राज्याला मोठा निधी मिळत आहे,' असा टोला त्यांनी लगावला.

# प्रफुल्ल पटेल यांची राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या अध्यक्षपदी नियुक्ती?

वृत्तसंस्था १ फेब्रुवारी

**नवी दिल्ली :** अजित पवार यांच्या अकाली निधनानंतर प्रफुल्ल पटेल यांची राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या अध्यक्षपदी निवड झाली आहे. पक्षाचे सर्व अधिकार आता प्रफुल्ल पटेल यांच्याकडे असतील. पक्षाचे सर्व अधिकार आता त्यांच्या हातात देण्यात आले असून राजकीय वर्तुळात मोठी चर्चा सुरू आहे. प्रफुल्ल पटेल यांची नियुक्ती केली कुणी? असा सवाल विचारला जात आहे. शरद पवार यांना राजकीय खेळातून दूर ठेवण्यासाठी पेटल यांच्याकडे जबाबदारी सोपवण्यात आल्याची चर्चा आहे. पेटल यांच्या नियुक्तीची घोषणा भाजप नेत्यांकडून का केली ? असा सवाल उपस्थित होतोय.

केंद्रीय मंत्री पियूष गोयल पीटीआय वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत प्रफुल्ल पटेल राष्ट्रीय अध्यक्ष अपॉईंट केले गेलेत, अशी माहिती दिली होती. ते म्हणाले की, दोन्ही राष्ट्रवादी कॉंग्रेसचं विलिनीकरण आज घडीला तरी शक्य नाही. उलट दादांनी पुणे-पिंपरीत महायुतीत निवडणूक लढवली असती तर ते तिथंही सत्तेत असते. अजित पवार हयात असताना ते राष्ट्रवादी कॉंग्रेसचे अध्यक्ष होते. प्रफुल्ल पटेल कार्यकारी अध्यक्ष होते. पण आता अजित पवार यांच्या निधनानंतर अध्यक्षपदी प्रफुल्ल पटेल यांची निवड झाल्याचे समजतेय. पण पटेल यांची नियुक्ती कधी झाली? असा सवाल राजकीय स्तरातून विचारला जातोय. कारण, शनिवारी अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांची गटनेता म्हणून निवड करण्यात आली अन् त्यांनी उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली.

# प्रफुल्ल पटेल यांचा खुलासा!

प्रतिनिधी १ फेब्रुवारी

**मुंबई:** राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी माझी नियुक्ती झाल्याच्या बातम्या सध्या विविध प्रसारमाध्यमांमध्ये आणि सोशल मीडियावर फिरत आहेत. मात्र, या सर्व बातम्या पूर्णपणे निराधार असून त्यामध्ये कोणतेही तथ्य नाही, असे स्पष्टीकरण प्रफुल्ल पटेल यांनी दिले आहे.

या संदर्भात अधिक स्पष्टता देताना सांगण्यात आले की, राष्ट्रवादी कॉंग्रेस हा एक लोकशाही विचारांचा आणि मूल्यांचा पक्ष आहे. राष्ट्रीय अध्यक्षपदासारख्या अत्यंत महत्त्वाच्या आणि मोठ्या निर्णयाबाबत पक्षाची एक ठराविक घटनात्मक प्रक्रिया आहे. अशा पदाचा निर्णय हा वैयक्तिक नसून तो सर्वांगीण विचारविनिमयातूनच घेतला जातो.

# मुख्यमंत्र्यांच्या जि.प. निवडणूक प्रचारसभा रद्द!

प्रतिनिधी १ फेब्रुवारी

**मुंबई :** अजित पवार यांच्या निधनामुळे यंदा जिल्हा परिषद निवडणूक प्रचार न करण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला आहे. स्थानिक नेते, पदाधिकारी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीत प्रचार करतील. देवेंद्र फडणवीस कोणताही प्रचार करणार नाही.

राज्यातील १२ जिल्हा परिषद अणि १२५ पंचायत समितीसाठी ७ फेब्रुवारीला मतदान होणार आहे. त्याआधी ५ फेब्रुवारीपर्यंत प्रचारासाठी वेळ देण्यात आली आहे. यासाठी देवेंद्र फडणवीसांच्या ७ दिवसांत २२ प्रचारसभा होणार होत्या. आता अजित पवार यांच्या निधनामुळे देवेंद्र फडणवीसांनी सर्व सभा रद्द केल्या असून एकही सभा न घेण्याचा निर्णय त्यांनी घेतला आहे. राज्यातील १२ जिल्हा परिषदा आणि त्याअंतर्गत १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या तारखेमध्ये राज्य निवडणूक आयोगाने बदल केला आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे राज्यात जाहीर करण्यात आलेल्या तीन दिवसांच्या दुखवट्याच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार ५ फेब्रुवार रोजी होणारे मतदान आता ७ फेब्रुवारी रोजी होणार असून आहे. तर मतमोजणीची तारीखही बदलून ९ फेब्रुवारी करण्यात आली आहे.

# भाजपा शहराध्यक्षाचा.... शहर स्वच्छतेचा 'सवाल' सोशल मीडियावर 'बवाल' !

▶▶म्हणे शहराची स्वच्छता कधी होणार
▶▶ आता जनता कोणाला प्रश्न विचारणार

अतिश देशमुख १ फेब्रुवारी

**वाशिम:** भाजप वाशिम शहराध्यक्ष मनीष मंत्री यांनी सोशल मीडियावर केलेल्या एका प्रश्नामुळे वाशिम शहराच्या राजकारणात खळबळ उडाली आहे. 'वाशिम शहर कधी स्वच्छ होणार?' असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केल्याने सर्वत्र चर्चेला उधाण आले आहे.

विशेष म्हणजे देशात, राज्यात, मतदारसंघात तसेच वाशिम शहरात भाजपचेच सरकार असताना शहराध्यक्षांकडूनच असा प्रश्न विचारला जात असल्याने नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. आता नागरिकांनी त्यांच्या समस्या आणि प्रश्नच कुणाकडे मांडावे यावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. वाशिम शहर भकात झाले आहे. शहराचा विकास व्हावा म्हणून जनतेने भाजपच्या हाती सत्ता दिली. शहरात चालला रस्ते नाहीत ,प्यायला शुद्ध पाणी नाही , गरिबांनाराहायला घर नाही कारण घरकुल घोटाळा अन भूखंड खरेदी विक्री बंद आहे. रस्त्यावर लाईट नाहीत. पंधरा वर्षापासून प्रक्रिया न करताच कचरा खाल्ल्या जात आहे. लोकप्रतिधीच ठेकेदार झाले आहेत. त्यामुळेनागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. 'तुम्हीच भाजपचे शहराध्यक्ष आहात, तुम्हीच जर प्रश्न विचारत असाल तर जनतेने प्रश्न कोणाला विचारायचे? आणि जनतेचे प्रश्न सोडवणार कोण?' असा सवाल आता शहरातील नागरिक विचारत आहेत.

भाजपा वाशिम शहराध्यक्ष मनीष मंत्री यांनी सोशल मीडियावर वाशिम शहर कधी स्वच्छ होणार या विचारलेल्या प्रश्नावर खळबळ उडाली आहे....!




देशात तुमचे सरकार
,राज्यात तुमचे सरकार
,मतदार संघात तुमचे सरकार ,
आणि शहरात तुमचे सरकार...
तुमचाच आमदार
जवाई ठेकेदार
९० कामगार
केले बेरोजगार
तुम्हीच भाजपचे शहराध्यक्ष
आहात..
तुम्हीच जर प्रश्न करत असाल..
तर जनतेने काय प्रश्न करावे..
जनतेची प्रश्न कोणी सोडवावे..
आता किती दिवस
कटिंग येतो बटेंगे..
जातिवाद आणि धर्म खतरेमे..
गुन्हेगारी खत्म करा ,
विकास करा..
यासाठीच तुम्हाला
जनतेने निवडून दिले.

### 'कटेंगे तो बटेंगे', धर्म खतरे मे....

जातिवाद, धर्माच्या नावावरचे राजकारण थांबवून गुन्हेगारीवर आळा घालावा व प्रत्यक्ष विकासकामांवर भर द्यावा, हीच जनतेची अपेक्षा असल्याचे मत नागरिकांमधून व्यक्त होत आहे. विकासासाठीच जनतेने प्रतिनिधींना निवडून दिले असून आता प्रत्यक्ष कृती कधी होणार, हा प्रश्न कायम आहे.

# विकसित महाराष्ट्र घडवण्यासाठी अखंड काम करीन - उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार

प्रतिनिधी १ फेब्रुवारी

**मुंबई:** अजित पवार यांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांनी शनिवारी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. अजितदादांच्या निधनाच्या तिसऱ्याच दिवशी हा शपथविधी झाल्याने आता यावर संमिश्र प्रतिक्रिया उमटत आहेत. काहींनी या निर्णयाचं स्वागत केलं आहे. तर काहींनी यावर टीका केली आहे. शरद पवार यांनी देखील यावरून नाराजी व्यक्त केली होती. आपल्याला शपथविधीबाबत काहीच माहीत नसल्याचं त्यांनी म्हटलं होतं.

शनिवारी सकाळपासून अनेक नाट्यमय घडामोडी घडल्यानंतर सायंकाळी साडेपाच वाजता सुनेत्रा पवारांनी उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. त्या महाराष्ट्राच्या पहिल्या उपमुख्यमंत्री ठरल्या आहेत. एकीकडे शपथविधी पूर्ण होताच मुख्यमंत्री फडणवीसांनी मोठा निर्णय घेतला आहे. त्यांनी आपल्या राज्यातील सर्व प्रचारसभा रद्द केल्या आहेत. एकही सभा घेणार नसल्याचा निर्णय त्यांनी घेतला आहे.सुनेत्रा पवार यांनी एवढ्या घाईघाईने शपथ का घेतली? राष्ट्रवादीतील सहकाऱ्यांनी विधिमंडळ पक्षाच्या बैठकीसाठी एवढी घाई का केली? असे प्रश्न महाराष्ट्रात चर्चिले जात असताना या सगळ्या प्रश्नांची उत्तरे सुनेत्रा पवार यांनी शपथ घेतल्यानंतर दिली आहे.



दादांच्या अकाली जाण्याने वैयक्तिक आयुष्यातच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्राच्या मनावर दुःखाचा मोठा डोंगर कोसळला आहे. मात्र त्यांनी दिलेली कर्तव्यनिष्ठा, संघर्षाची ताकद आणि जनतेप्रतीची प्रामाणिक बांधिलकी हाच माझा खरा आधार असल्याचे ते म्हणाल्या.

आज महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री पदाची शपथ घेताना मन अत्यंत भावुक झाले आहे. आदरणीय अजितदादांनी आयुष्यभर शेतकरी, कष्टकरी, महिला, युवक आणि समाजातील वंचित घटकांसाठी जगण्याचा मंत्र दिला.

सिटी न्यूज अमरावती
रविवार, दि. १ फेब्रुवारी २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# अमरावती जिल्हा विकास आराखड्यासाठी १२७२ कोटींची मागणी

**अमरावती :** जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी तयार करण्यात आलेल्या विकास आराखड्यासाठी तब्बल १२७२ कोटी रुपयांचा निधी आवश्यक असल्याची मागणी करण्यात आली आहे. मात्र शासनाने जिल्ह्यासाठी सध्या केवळ ४३४.७१ कोटी रुपयांची मर्यादा निश्चित केली आहे. त्यामुळे उर्वरित मोठ्या निधीची गरज निर्माण झाली असून अतिरिक्त निधी मिळवण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

या विकास आराखड्यात रस्ते, पाणीपुरवठा, शिक्षण, आरोग्य, सिंचन तसेच इतर मूलभूत सुविधांचा समावेश आहे. मात्र उपलब्ध निधी कमी असल्याने अनेक महत्त्वाच्या कामांवर मर्यादा येण्याची शक्यता आहे. त्यामुळे जिल्ह्याच्या विकासासाठी शासनाने निधी वाढवावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

अधिक निधी उपलब्ध झाल्यास रखडलेली विकासकामे गतीने पूर्ण होतील आणि जिल्ह्याच्या सर्वांगीण प्रगतीला चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# एसडीओ कार्यालयासमोर आंदोलन

## ♦ टेंब्रुसोंडा–परसापुर रस्त्यासाठी आदिवासी आक्रमक; अचलपूर एसडीओ कार्यालयासमोर धरणे आंदोलन

प्रतिनिधी १ फेब्रुवारी



**अमरावती:** टेंब्रुसोंडा ते परसापुर या रस्त्याच्या कामासाठी आदिवासी नागरिकांनी अचलपूर उपविभागीय अधिकारी (एसडीओ) कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले. रस्त्याचे काम तातडीने सुरू करावे, या प्रमुख मागणीसाठी आदिवासी नागरिक ठिय्या देऊन बसले होते.

या संदर्भात नियोजित बैठक अचानक रद्द झाल्याने आंदोलकांमध्ये तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. रस्ता नसल्यामुळे दळणवळणाची मोठी अडचण निर्माण होत असून विद्यार्थी, रुग्ण व ग्रामस्थांना दररोज त्रास सहन करावा लागत असल्याचे आंदोलकांनी सांगितले.

वारंवार मागणी करूनही रस्त्याच्या कामाकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत, जोपर्यंत ठोस निर्णय होत नाही तोपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा इशारा आदिवासी नागरिकांनी दिला आहे. प्रशासनाने तातडीने दखल घेऊन समस्या सोडवावी, अशी मागणी आंदोलकांकडून करण्यात येत आहे.

# वाहतूक नियमांसाठी रस्त्यावर उतरली पोलिस यंत्रणा; अमरावतीत हेल्मेट रॅलीद्वारे जनजागृती

प्रतिनिधी १ फेब्रुवारी



**अमरावती :** रस्ते अपघातांमध्ये होणारी जीवितहानी रोखण्यासाठी आणि नागरिकांमध्ये वाहतूक नियमांबाबत जागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने अमरावती शहर वाहतूक पोलिस विभागाच्या वतीने भव्य हेल्मेट रॅलीचे आयोजन करण्यात आले.

रस्ता सुरक्षा सप्ताहानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या या रॅलीत वाहतूक पोलिस अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले होते. दुचाकीस्वारांनी हेल्मेट घालून शहरातील प्रमुख मार्गांवरून रॅली काढण्यात आली. या माध्यमातून नागरिकांना हेल्मेट वापरण्याचे महत्त्व पटवून देण्यात आले.

केवळ दंड वसुली हा उद्देश नसून, प्रत्येक नागरिकाने स्वतःच्या सुरक्षिततेसाठी वाहतूक नियमांचे पालन करावे,ÿ असा संदेश या रॅलीतून देण्यात आला. विशेषतः दुचाकी चालविताना हेल्मेट वापरणे, वेगमर्यादा पाळणे आणि नियमांचे उल्लंघन टाळणे याबाबत जनजागृती करण्यात आली. दरम्यान, शाळा व महाविद्यालयांमध्येही रस्ता सुरक्षेबाबत जनजागृती कार्यक्रम राबविण्यात येणार असून, विद्यार्थ्यांमध्ये लहानपणापासूनच वाहतूक शिस्त रुजवण्याचा प्रयत्न असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

वाहतूक नियमांचे पालन केल्यास अपघातांचे प्रमाण कमी होऊन अनेकांचे प्राण वाचू शकतात, असे आवाहन पोलिस प्रशासनाने नागरिकांना केले आहे.

# चारचाकी वाहन चोरी करणारा गुन्हेगार ताब्यात

## ♦ त्याचे कडुन एकुण ०२ चोरीचे गुन्हे उघडकीस ६,४८,०००/- रू. चा मुददेमाल जप्त

प्रतिनिधी १ फेब्रुवारी



**अमरावती :** पोलीस आयुक्त अमरावती शहर यांनी अमरावती शहरातील चोरी चे गुन्हे उघडकिस आणणे बाबत आदेशीत केलेवरून पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण, गुन्हे शाखा अमरावती शहर यांचे नेतृत्वात पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी गुप्त बातमीदार नेमुन खालील प्रमाणे कार्यवाही केली आहे.

पो.स्टे. बडनेरा येथील अप क्र. ५२/२०२६ कलम ३०५ (ब), ३०५(क) भा.न्या.सं प्रमाणे दाखल असुन सदर गुन्हयाचा समांतर तपास करीत असतांना सदरचा गुन्हा हा रेकॉर्ड वरील चोरी करणारा आंतरराज्यीय गुन्हेगार कमलेश रॉय जॉयराम रॉय, वय ३२ वर्ष, रा.४८६, राजाबाजार, ता. सिमला गुरी , सिडली, जि. चिरांग राज्य आसाम याने केला असल्याचे तपासा दरम्यान निष्पन्न झाले सदर आरोपी हा चोरी व जबरी चोरी करणारा सराईत गुन्हेगार असुन त्याचे वर चोरी व जबरी चोरीचे अमरावती शहर व आसाम राज्यामध्ये गुन्हे दाखल आहेत. सदर आरोपीचे कोणतेही निश्चित असे राहण्याचे ठिकाण नसुन तो महाराष्ट्रातील विवीध शहरामधे राहतो त्यामुळे सदर आरोपीला पकडणे पोलीसोसमोर आवाहन होते. आज दिनांक ३१/०१/२०२६ रोजी गुप्त बातमीदाराकडुन खात्रीलायक माहीती मिळाली की, आरोपी हा अमरावती येथुन चोरीची गाडी घेवुन आसाम ला जाणार आहे अशा मिळालेल्या माहिती वरून गुन्हे शाखेचे पथक यांनी त्याला लागलीच चांदुर रेल्वे रोड, ५०० क्वार्टस जवळ ताब्यात घेवुन त्यास गुन्हे शाखा कार्यालयात आणुन त्याची कसुन चौकशी करण्यात आली. त्यावरून आरोपी याने अमरावती शहरामधे एकुण ०२ चोरीचे गुन्हे केल्याची कबुली दिली वरून त्याचे ताब्यातुन चोरीच्या गुन्हयातील मुददेमाल जप्त करून खालील गुन्हे उघडकीस आणले आहेत.

ताब्यातील आरोपीतांचे नांव कमलेश रॉय जॉयराम रॉय, वय ३२ वर्ष, रा.४८६, राजाबाजार, ता. सिमला गुरी, सिडली, जि. चिरांग राज्य आसाम आहे. ताब्यात घेतलेला मुद्देमाल मध्ये एक महींद्रा विरो कंपनीचे चार चाकी पिकअप कं Mh27DT1805 कि अं ६,०० रु चार वाहनाच्या बॅट-या व इतर लोखंडी साहीत्य कि.अ. ४७,५००/- रू चा मुददेमाल रोख रक्कम ५००/- रू असा एकुण अं. ०६,४८,०००/- रू चा मुददेमाल जप्त करण्यात आला.

कारवाई . पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, पोलीस उपायुक्त श्याम घुगे, पोलीस उपायुक्त मुख्यालय तथा गुन्हे रमेश धुमाळ, सपोआ गुन्हे शाखा शिवाजी बचाटे यांचे मार्गदर्शनात गुन्हे शाखा चे पोलीस निरीक्षक संदिप चव्हाण, पोलीस निरीक्षक सिमा दाताळकर यांच्या नेतृत्वात पोउपनि गजानन सोनुने, पोलीस अंमलदार पोहेकॉ जहीर शेख, सचीन बहाळे,, नापोका अतुल संभे, पोकों सुरज चव्हाण, राजिक रायलीवाले, निखील गेडाम, सागर ठाकरे, चालक संदीप खंडारे, राहुल दुधे यांनी केली आहे.

# छोटेलाल हरदो हत्या प्रकरणात रुग्णालयात हायड्रामा; पोलिसांच्या आश्वासनानंतर नातेवाइकांनी मृतदेह स्वीकारला

प्रतिनिधी १ फेब्रुवारी

**अमरावती :** वलगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या शेतामध्ये ६४ वर्षीय वृद्ध छोटेलाल महादेव हरदो यांची अमानुष हत्या झाल्याची घटना उघडकीस आली असून या घटनेमुळे संपूर्ण अमरावती जिल्ह्यात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. या घटनेनंतर रुग्णालयात मृतदेह उचलण्यावरून मोठा गोंधळ निर्माण झाला होता.

मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवारी सकाळी छोटेलाल हरदो हे नेहमीप्रमाणे जनावरे चारण्यासाठी शेतात गेले होते. यावेळी त्यांच्यावर हल्ला करण्यात आला. गंभीर जखमी अवस्थेत त्यांना उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचार सुरू असतानाच त्यांचा मृत्यू झाला.

या घटनेची माहिती मिळताच नातेवाइकांनी रुग्णालयात गर्दी केली. पोलिस आणि डॉक्टरांनी हलगर्जीपणा केल्याचा आरोप करत नातेवाइकांनी मृतदेह ताब्यात घेण्यास नकार दिला. मृतदेह उचलण्यापूर्वी दोषींवर कडक कारवाईची मागणी करण्यात आली. त्यामुळे काही काळ रुग्णालय परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

दरम्यान, वलगाव पोलिसांनी या प्रकरणात संशयित आरोपी शाहरुख याला ताब्यात घेतले असून त्याच्याविरोधात हत्या प्रकरण दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. पोलिस प्रशासनाने घटनेची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असे आश्वासन नातेवाइकांना दिले. पोलिसांच्या या आश्वासनानंतर नातेवाइकांनी मृतदेह ताब्यात घेतला. यानंतर शवविच्छेदनाची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. या घटनेमुळे वलगाव परिसरासह आजूबाजूच्या गावांमध्ये मोठ्या प्रमाणात संताप व्यक्त होत आहे. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिस प्रशासनाने परिसरात बंदोबस्त वाढवला असून पुढील तपास सुरू आहे.

# सायन्सस्कोअर शाळेच्या साहित्य गोडाऊनला भीषण आग; लाखो रुपयांच्या नुकसानीचा अंदाज

प्रतिनिधी १ फेब्रुवारी



**अमरावती :** येथील सायन्सस्कोअर मैदानालगत असलेल्या जिल्हा परिषद ािश्रामगृहाजवळील सायन्सस्कोअर शाळेच्या साहित्य गोडाऊनला शनिवार, ३१ जानेवारी रोजी मध्यरात्री सुमारे एक वाजताच्या सुमारास अचानक भीषण आग लागली. या गोडाऊनमध्ये शाळेतील लाकडी बेंच, फर्निचर तसेच विविध शैक्षणिक साहित्य मोठ्या प्रमाणावर साठवून ठेवण्यात आले होते.

प्राथमिक माहितीनुसार आग सुरुवातीला किरकोळ स्वरूपाची होती. मात्र अचानक वाढलेल्या वाऱ्याच्या प्रवाहामुळे काही क्षणांतच तिने उग्र रूप धारण केले. आगीमुळे गोडाऊनमधील संपूर्ण साहित्य जळून खाक झाले असून नेमके किती आर्थिक नुकसान झाले, याचा अंदाज प्रशासनाकडून अद्याप लावता आलेला नाही.

आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे अधिकारी व कर्मचारी तातडीने घटनास्थळी दाखल झाले. आग आटोक्यात आणण्यासाठी पाच अग्निशमन बंबांच्या साहाय्याने मोठ्या प्रमाणावर पाणी फवारणी करण्यात आली. आग नियंत्रणात आणताना कर्मचाऱ्यांना मोठी कसरत करावी लागली.

दरम्यान, फ्रेजरपुरा व खोलापुरी गेट पोलीस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारीही घटनास्थळी पोहोचले. खोलापुरी गेट पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांच्या नेतृत्वाखाली मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. घटनेमुळे परिसरात नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. स्थानिक रहिवाशांनी वेळेवर अग्निशमन दलाला माहिती दिल्यामुळे मोठा अनर्थ टळला. आगीचे नेमके कारण शोधण्याचे काम पोलीस व संबंधित यंत्रणांकडून सुरू आहे.

# शेतीच्या नुकसानीची दर महिन्यात पाहणी करावी -जिल्हाधिकारी आशिष येरेकर

प्रतिनिधी १ फेब्रुवारी

**अमरावती :** नांदगाव पेठ येथील रतन इंडियाच्या प्रकल्पामुळे शेतपिकाचे नुकसान होत असल्याची तक्रारी येत आहे. शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळावी, यासाठी यानंतर आता दर महिन्यात शेतपिकांची पाहणी करण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिली.

जिल्हाधिकारी कार्यालयात आज रतन इंडिया पॉवर लिमीटेडमधील विविध प्रश्नांवर आज बैठक पार पडली. यावेळी आमदार राजेश वानखेडे, जिल्हा पोलिस अधिक्षक विशाल आनंद, उपविभागीय अधिकारी अनिल भटकर, जिल्हा खनीकर्म अधिकारी प्रणिता चापले यांच्यासह कंपनी अधिकारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी येरेकर म्हणाले, वीज प्रकल्पामुळे परिसरातील शेतपिकांचे नुकसान होत आहे. या नुकसानीची भरपाई मिळावी, यासाठी कृषी विभागातर्फे दर महिन्यात पाहणी करण्यात येईल. सध्या कृषी विभागाने शेतकऱ्यांचे जेवढे नुकसान नोंदविले आहे, त्याची भरपाई देण्यात येईल. यात कोणतीही कपात करू दिली जाणार नाही. यासोबतच १६ जणांच्या अनुकंपा तत्वावरील नोकरीचा प्रश्नही विचार करण्यात यावा. यासाठी व्यवस्थापनासोबतच चर्चा करावी. वाघोली गावात राखेची धुळ येत असल्यामुळे यावर उपाययोजना करण्यात याव्यात. तसेच गावाच्या स्थलांतरणाबाबत विचार करण्यात येईल. प्रकल्पामध्ये विविध करणांनी आंदोलने होतात. ही आंदोलने शांततेच्या मार्गाने करण्यात यावी. तसेच काही समस्या निर्माण झाल्यास जिल्हा प्रशासनाशी संपर्क साधावा. राखेच्या वाहतुकीमध्ये

# भेदभाव समाप्त करू या, सन्मानाची वागणूक देऊ या

## जिल्ह्यात आजपासून 'स्पर्श' कुष्ठरोग जनजागृती अभियान

प्रतिनिधी १ फेब्रुवारी

**अमरावती:** कुष्ठरोगाविषयी समाजात असलेली भीती, अंधश्रद्धा आणि भेदभाव दूर करून रुग्णांना सन्मानाची वागणूक देण्यासाठी उद्या, ३० जानेवारी ते १३ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत संपूर्ण जिल्ह्यात 'स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियान' आणि 'कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र अभियान' राबविण्यात येणार आहे. या मोहिमेच्या जिल्हास्तरीय समन्वय समितीची सभा जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच संपन्न झाली असून, त्यांनी जिल्ह्यातील नागरिकांना या अभियानात सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले आहे.

कुष्ठरोग हा पुरातन काळापासून अस्तित्वात असला, तरी आजही या आजाराबद्दल अनेक भ्रामक कल्पना समाजात आहेत. ही परिस्थिती बदलण्यासाठी आणि कुष्ठरुग्णांना भारतीय संविधानाने दिलेल्या 'समानतेच्या अधिकाराची' जाणीव करून देण्यासाठी यंदा 'भेदभाव समाप्त करूया, सन्मानाची वागणूक देऊया' हे घोषवाक्य निश्चित करण्यात आले आहे.

बहुविध औषधोपचार पद्धतीमुळे हा आजार शंभर टक्के बरा होतो. सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये यावरील औषध मोफत उपलब्ध आहे. वेळेत उपचार घेतल्यास कुष्ठरोगामुळे येणारी शारीरिक विकृती पूर्णपणे टाळता येते. मात्र, निदानास उशीर झाल्यास रुग्णाच्या कार्यक्षमतेवर आणि पर्यायाने देशाच्या आर्थिक प्रगतीवरही परिणाम होतो. या अभियानामध्ये नियमित सर्वेक्षणासोबतच समाजातील वंचित घटकांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे.

# गुरु कुंजमध्ये चोरट्यांचा धुमाकूळ

## सद्गुरू विहारातील घरफोडीत २१,५०० रुपयांचा ऐवज लंपास

**अमरावती :** गुरुकुंज मोझरी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सद्गुरू विहार परिसरात अज्ञात चोरट्यांनी घरफोडी केल्याची घटना समोर आली आहे. या घरफोडीत चोरट्यांनी घरातून सुमारे २१ हजार ५०० रुपयांचा ऐवज लंपास केल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सद्गुरू विहार परिसरातील संबंधित घरातील कुटुंबीय काही कारणाने बाहेर गेले होते. याच संधीचा फायदा घेत अज्ञात चोरट्यांनी घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. घरातील कपाटे व साहित्य अस्ताव्यस्त करत चोरट्यांनी रोख रक्कम व मौल्यवान वस्तूंवर हात साफ केला. घरमालक परत आल्यानंतर घरफोडी झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यानंतर तात्काळ गुरुकुंज मोझरी पोलीस ठाण्यात घटनेची तक्रार दाखल करण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली असून, पंचनामा करण्यात आला आहे. या प्रकरणी अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासण्याचे काम सुरू आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट

## खामगाव

# खामगावात सर्व पक्षाच्या वतीने स्व. अजितदादा पवार यांना श्रद्धांजली

## ♦ सर्वपक्षीय श्रद्धांजली कार्यक्रमात जिल्ह्याच्या विकासकार्याला मान्यवरांनी दिला उजाळा

प्रतिनिधी १ फेब्रुवारी

**खामगाव :** दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी अनेक जिल्ह्यात महत्त्वकांक्षी योजना राबवल्या, भविष्यात सुद्धा जिल्ह्याच्या विकासासाठी चालना देत असताना नियतीने त्यांच्यावर आघात केल्यामुळे जिल्ह्याचे खूप मोठे नुकसान झाले. खामगाव येथे सर्व पक्षांच्या वतीने श्रद्धांजली अर्पण करून संवेदना व्यक्त केल्या.

खामगाव येथील शहर पोलीस स्टेशन समोरील गांधी उद्यानाच्या प्रांगणात सायंकाळी मावळत्या सूर्याला साक्षी ठेवून महाराष्ट्र राज्याच्या राजकारणात अजितदादांच्या स्मृतींना उजाळा देऊन भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केले. मान्यवरांच्या हस्ते महात्मा गांधी यांच्या पुतळ्याचे व स्वर्गीय अजित दादा पवार. अंगरक्षक विदिप जाधव, कॅप्टन सुमित कपूर, कॅप्टन शुभमवी पाठक, फ्लाईट अटेंडंट पिंकी माळी यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले. त्यांच्या आठवणींना उजाळा दिला. श्रद्धांजली सभेस यांच्यासह

विविध पक्षांचे पदाधिकारी, नगरसेवक, उद्योजक, पत्रकार, वकील, डॉक्टर्स व विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वपक्षीय नेते पदाधिकारी व नागरिकांनी श्रद्धांजली अर्पण केली. या कार्यक्रमाला सर्वपक्षीय नेते, कार्यकर्ते, शैक्षणिक, सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, डॉक्टर, शिक्षक, प्राध्यापक, वकील व पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी मौन श्रध्दांजलीने कार्यक्रमाचा समारोप झाला. श्रद्धांजली सभेचे सूत्रसंचालन अरविंद शिंगाडे यांनी केले.

# आरोपींना तात्काळ अटक करा : अग्रवाल समाजाची पोलीस विभागाकडे मागणी

## ♦ अग्रवाल यांच्या घरावरील हल्ल्याविरोधात समाजबांधवांचा सोमवारी खामगावात बंद

प्रतिनिधी १ फेब्रुवारी

**खामगाव :** शहरापासून जवळच असलेल्या वाडी येथील मनोज अग्रवाल यांच्या घरावर चोरट्यांनी सशस्त्र हल्ला करून पिता पुत्रांना गंभीर जखमी करत मुद्देमाल लंपास केल्याची घटना घडली होती. या घटनेला आता आठवडा उलटत आला तरी आरोपींना पोलिसांनी अटक केली नाही. त्यामुळे सदर आरोपींना तात्काळ अटक करावी, या मागणीला घेऊन सोमवार २ फेब्रुवारी रोजी अग्रवाल समाजाची सर्व प्रतिष्ठाणे बंद राहणार असल्याचे निवेदन समाजाकडून पोलीस विभागाला ३१ जानेवारी रोजी देण्यात आले.

दिलेल्या निवेदनात नमूद आहे की, वाडी येथील वृंदावन नगरातील मनोज गुलाबचंद अग्रवाल यांच्या घरात जबर चोरी करतांना अज्ञात चोरट्यांना पकडण्याचा प्रयत्न करणाऱ्या मनोज अग्रवाल व मयंक अग्रवाल या पिता पुत्रांवर धारदार शस्त्राने हल्ला करून गंभीर जखमी केले. तसेच मुद्देमाल लंपास केला. याप्रकरणातील आरोपींना अद्यापपर्यंत पकडण्यात पोलिसांना यश आले नाही. चोरट्यांच्या या धाडसी वृत्तीमुळे समाजबांधवांमध्ये तसेच व्यापारी वर्गात भितीचे वातावरण निर्माण झाले असून शहरात चोरींच्या घटनासुध्दा वाढल्या आहेत. नागरिकांमध्ये भितीचे आणि दहशतीचे वातावरण दिसून येत आहेत. शहरात विविध भागात चोरींच्या घटना घडतांना दिसून येत आहे. पोलीस विभागाने शहरातील व्यापारी भागात तसेच वस्त्यांमध्ये रात्रीची गस्त वाढवावी, तसेच रात्री बे रात्री फिरणाऱ्या नागरिकांची चौकशी करावी, तसेच वाडी येथील मनोज अग्रवाल यांच्या घरावरील हल्ला करणाऱ्या गुन्हेगारांना त्वरीत अटक करावी, अशी मागणी ३१ जानेवारी रोजी शहर पोस्टेला दिलेल्या निवेदनातून श्री अग्रसेन भवन मंडळ व अग्रवाल समाजाच्या वतीने अध्यक्ष सुरज बजरंगलाल अग्रवाल यांनी केली आहे. तसेच उपरोक्त घटनेच्या निषेधार्थ सोमवार २ फेब्रुवारी रोजी दुपारी १२ वाजेपर्यंत अग्रवाल समाज बांधव आपली प्रतिष्ठाने बंद ठेवणार आहेत.

# राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांचा दौरा

**अमरावती:** गृह (ग्रामीण), गृहनिर्माण, शालेय शिक्षण, सहकार व खनिकर्म राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर रविवार, दि. १ फेब्रुवारी रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत.

दौऱ्यानुसार डॉ. भोयर हे रात्री ८ वाजता तिवसा येथील श्री. देवरावदादा हायस्कूल प्रांगणात आयोजित 'आमदार चषक २०२६' या अखिल भारतीय पुरुष व महिला कबड्डी स्पर्धेच्या बक्षीस वितरण सोहळ्याला उपस्थित राहतील. त्यानंतर सोयीने नागपूरकडे प्रयाण करतील.

सिटी न्यूज अकोला

रविवार, दि. १ फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## हिदायत पटेल खून प्रकरणात ॲड. फाजील खॉ व फारुख खॉ पटेल यांचा अटकपूर्व जमानत अर्ज दाखल

**अकोट:** काँग्रेसचे नेते हिदायत पटेल खून प्रकरणात संशयीत आरोपी ॲड. फाजील खाँ आसीफ खाँ पटेल व फारुख खाँ आसिफ खाँ पटेल राहणार मोहाळा यांनी अकोट सत्र न्यायालयात अटकपूर्व जामीन अर्ज दाखल केला. ३१ रोजी विदयमान अकोट सत्र न्यायालयात या प्रकरणातील तपास अधिकारी सहायक पोलिस अधीक्षक निखील पाटील यांनी सरकारी वकील अजित देशमुख यांचे मार्फत जमानत अर्जाला लेखी उत्तर दाखल केले. आरोपीतर्फे ॲड. जुबेर अहेमद अमरावती व ॲड. व्ही. एस. लाखे अकोट यांनी जमानत अर्ज दाखल केला आहे. या प्रकरणात जमानत अर्जावर युक्तीवादा करीता ०३.०२.२०२६ सुनावणी ठेवण्यात आली आहे. या प्रकरणात गुन्हा दाखल झाल्यापासुन सर्व संशयित आरोपी फरार असल्याचे समजते.

## चेंबरच्या पदाधिकाऱ्यांनी घेतले गजाननाचे दर्शन



**अकोला:** विदर्भ चेंबरच्या वतीने स्थानीय गोरक्षण मैदानात २ जानेवारी ते ५ जानेवारी पर्यंत संपन्न झालेल्या विटेक्स प्रदर्शनीच्या यशस्वी सफलतेबद्दल चेंबरच्या पदाधिकाऱ्यांनी शेगाव येथे उपस्थित होऊन संत गजानन महाराज यांच्या प्रतिमेचे दर्शन घेतले. विटेक्स प्रदर्शनीच्या निर्विघ्नपणे सफलतेसाठी चेंबर पदाधिकाऱ्यांनी चेंबरचे अध्यक्ष निकेश गुप्ता यांच्या पुढाकारात संत गजानन महाराज यांना सफलतेसाठी साकडे घातले होते. विटेक्स प्रदर्शनीत तब्बल दीड लाख नागरिकांनी आपली उपस्थिती दर्शवित प्रदर्शनीत मांडण्यात आलेल्या १९१ स्टॉलला भेटी दिल्या होत्या. या प्रदर्शनीत व्यापारी व उद्योजक व सेवा प्रतिष्ठान,उद्योगानी विविध उत्पादनाचे प्रदर्शन करीत नागरिकांची सेवा केली होती. प्रदर्शनीत वेगवेगळ्या प्रकारचे सेमिनार, इस्कॉनचे संकीर्तन, महिला उद्यमीचे सांस्कृतिक कार्यक्रम आदी घेण्यात आले होते.

## सिंधी कॅम्प येथे दिवंगत अजित पवार यांचा श्रद्धांजली कार्यक्रम

**अकोला:** राज्याचे उपमुख्यमंत्री स्व. अजित पवार यांचा श्रद्धांजली कार्यक्रम स्थानीय सिंधी कॅम्प परिसरात संपन्न झाला. सिंधू सीनियर सिटीजन असो, उमेद फाउंडेशन व भ्रष्टाचार निर्मूलन समिती अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या श्रद्धांजली कार्यक्रमात स्व. अजितदादा पवार यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून त्यांना सामूहिक भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.यावेळी दीपक मनवाणी व मोहन नागवाणी यांनी शब्द-सुमनांद्वारे आपल्या भावना व्यक्त केल्यात. या सामूहिक श्रद्धांजली कार्यक्रमात उपस्थित सर्व नागरिकांनी स्व. अजित पवार यांच्या सामाजिक व सार्वजनिक जीवनातील योगदानाची आठवण करून त्यांना पुष्पांद्वारे भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

## निधन वार्ता

### नामदेवराव कवळकार



**हिवरखेड:** विकास मैदानातील रहिवासी नामदेवराव संपतजी कवळकार (८७), यांचे ३१ जानेवारी रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात सात मुले आणि मोठा आप्त परिवार आहे.

# सावरा येथे श्री विश्वकर्मा जन्मोत्सव साजरा

प्रतिनिधी १ फेब्रुवारी

**अकोट:** सावरा सृष्टीचे निर्माते शिल्पकार प्रभू श्री विश्वकर्मा यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली दि. ३१ रोजी सर्व सुतार बांधव च्या वतीने विश्वकर्मा बहुउद्देशीय संस्था यांच्या वतीने साजरी करण्यातआली, सर्वप्रथम प्रभू भगवान श्री विश्वकर्मा यांच्या प्रतिमेचे पूजन सरपंच स्वातीताई वैभव गुजरकर व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी दिगंबर सामतकर ,शुभम अजमीरे ,सावंत राठोड, भास्कर बानते नागपूर तसेच प्रमुख अतिथी शिवशंकर सोनोणे, शिवा पेटकर,वैभव गुजरकर होते यावेळी सरपंच स्वातीताई वैभव गुजरकर यांनी मनोगत व्यक्त केले यावेळी उपस्थित संतोष पुनकर शिवशंकर घाटोळकर, नरेश पुनकर, सुनिल



सामतकर, देवेंद्र पुनकर, प्रवीण खेडकर ,चांदुरकर महाराज, सुभाष पुनकर ,विठ्ठल पुनकर, राजेश बाळापुरे, सुरेश पुणकर, शंकर आकोटकर, गणेश पुनकर, योगेश पुणकर, प्रणय पुनकर, शुभम पुनकर,उपस्थित होते यावेळी गजानन ढोसे सर आज रोजी सेवानिवृत्त झाले, यानिमित्य विश्वकर्मा बहुउद्देशीय संस्थाच्या वतीने त्यांचा शाल, श्रीफळ देऊन यशोजीत सत्कार करण्यात आला .महिलांची उपस्थिती लाभली संगीता पुनकर, मुक्ता पुनकर, स्नेहल घाटोळकर, मेघा पुनकर ,पुष्पा बाळापुरे, शकुतला पुनकर, सारिका पुणकर, कल्पनाआकोटकर ,अनु पुनकर मंगला पुनकर, अरुणा सामतकर, अलका पुनकर, जया भोलनकर, वर्षा पुनकर ,अनीता घाटोळकर आदीची उपस्थिती होती.

तरुण उत्साही, गौरव पुनकर,ओम घाटोळकर जयेश पुनकर, वैभव पुनकर, श्रीयश पुनकर , सार्थक आकोटकर, यश पुनकर ,भावीक आकोटकर व चेतू यांनी परिक्षम घेतले. कार्यक्रमाचे नियोजन विश्वकर्मा बहुउद्देशीय संस्था सावरा च्या वतीने केले होते .महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली संस्थेच्या वतीने सर्वांच्या आभार मानले,

# धाबेकर नगर येथे संत गजानन महाराज प्रगट दिन महोत्सव

प्रतिनिधी १ फेब्रुवारी

**अकोला:** संत गजानन महाराज मंदिर धाबेकर नगर येथे संत गजानन महाराज प्रगटदिन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. ०१ ते ०७ फेब्रुवारी रोज सकाळी श्रींचा अभिषेक, ६ ते ८ संत गजानन महाराज सामूहिक विजय ग्रंथ पारायण, सकाळी १० ते ०१ व ०२ ते ०५ दरम्यान ह.भ.प. मंगेश महाराज वराडे यांची श्रीमद् भागवत कथा, सायंकाळी हरिपाठ व रात्री ०८ ते १० हरिकीर्तन होईल. यामध्ये ०१ रोजी ह.भ.प पंकज महाराज पवार (कारंजा), ०२ रोजी ह.भ.प. अशोक महाराज इदगे (आळंदी), ०३ ला ह.भ.प.मंगेश महाराज वराडे (दाताळा), ०४ रोजी ह.भ.प.भरत महाराज पाटील (म्हैसवाडीकर), ०५ रोजी ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज वाघ (वारी भैरवगड), ०६ रोजी ह.भ.प. कैलास महाराज येवले (आळंदी), ०७ रोजी ह.भ.प.चकोर महाराज बाविस्कर (मुंबई) तसेच प्रगट दिन ०८ रोजी सकाळी ०६ ते ०८ श्रींचा रुद्रभिषेक, सकाळी १० ते दुपारी १२ काल्याचे किर्तन ह.भ.प. भागवत महाराज देशमुख (जळगाव खान्देश), महाआरती व १२ ते ०३ महाप्रसाद वितरण होईल. रात्री ०७ ते १०.३० दरबार गजाननाचा ह.भ.प. सुजित महाराज पाटील गजानन महाराज चरित्र सादर करतील.


# जळगाव नहाटे येथील आरती घोपेची केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलात निवड

प्रतिनिधी १ फेब्रुवारी

**अकोट:** जळगाव नहाटे येथील शेतकरी मजुराची मुलगी आरती मधुकर घोपे यांची निवड केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल मध्ये निवड झाली. गावकरी मंडळींनी शुभेच्छा दिल्या.

यशाच्या मागे वडिलांचे सहकार्य होते. यशाचे श्रेय आई-वडील आणि राजे संभाजी अकॅडमीचे संस्थापक राजीव खारोडे यांना देते. यापूर्वी स्टाफ सिलेक्शन मार्फत घेण्यात आलेल्या दिल्ली पोलीस कॉन्स्टेबल या परीक्षेमध्ये उत्तीर्ण झाल्यावर ग्राउंड मध्ये दोन सेकंद अपयश आले होते तरी सुद्धा पुन्हा जिद्दीने पुन्हा प्रयत्न करून देशाच्या सेवेसाठी सज्ज झाली आहे,

गावचे सरपंच शरद नहाटे ,सम्यकदृष्टी बहुउद्देशीय सेवाभावी शिक्षण संस्थेचे



संस्थापक अध्यक्ष निखिल वानखडे ,अनिल चित्ते, माजी सरपंच रीना वानखडे ,रूपालीताई काकडे, वामन शेगोकार, राजेंद्र हाडोळे ,गोविंद काकडे, पुरुषोत्तम पवार ,महेंद्र बेलोकार ,एकनाथ नहाटे, मंगेश गोरडे ,अतुल हाडोळे ,विजय नहाटे, अनिल नहाटे, मंगेश पवित्रकार ,मुरली नहाटे ,नितीन हिंगणकर ,आशा वर्कर मंगला वानखडे, विठ्ठल नहाटे, सुनील वानखडे ,रोशन गवई यांनी सर्वांनी सत्कार केला.

# न्यू तापडिया नगरात श्रींचा प्रगटदिन उत्सव सुरू

प्रतिनिधी १ फेब्रुवारी

**अकोला:** न्यू तापडिया नगरातील संत श्री गजानन महाराज मंदिर व श्री हनुमान मंदिरच्या प्रांगणात रविवार १ फेब्रुवारी पासून श्रींच्या प्रगटदिन उत्सवाला आरंभ झाला. या निमित्त श्रीमद भागवत कथा, श्री गजानन विजय ग्रंथाचे सामूहिक पारायण तसेच धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे.

हभप महेश महाराज मते शिरसोली कथावाचक आहेत. रविवारी सकाळी ६ वा. श्रींचा अभिषेक झाला. तीर्थ स्थापना, ग्रंथ दिंडी काढण्यात आली. दुपारी ३ ते ५ श्रीमद् भागवत कथा, सायंकाळी



६ वा. हरिपाठ, ७ वा. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची सामूहिक प्रार्थना. साई गजानन गुरूदेव भजन मंडळ डुबकी रोड सादर करतील. गायनाचार्य संजय सावरकर, सोपान चौधरी, मृदंगाचार्य कपिल शेळके, टाळकरी राजेश्वर अडकणे राहतील. जय हनुमान विश्वस्त मंडळ व संत गजानन महाराज सेवा समितीचे अध्यक्ष गजानन मालठाणकर, उपाध्यक्ष अशोक मते, सचिव गणेश मैदान, विकास रोटकर, सुनील देशमुख, उमेश श्रीवास्तव, रघुनाथ फोकमारे, नगरसेवक प्रशांत जोशी, प्रवीण भिवगडे, अनंत चोपडे, राजेश ताथोड, मनोज पत्की, अतुल कुलकर्णी, शिवशंकर झामरे तसेच या भागातील रहिवाशांचा उत्सवात सहभाग आहे.

# भाजपाला हिंदुत्व शिकवणाऱ्या स्थानिक नेत्यांनी स्वतःच्या पक्षाच्या धोरणांचे-विचारांचे आत्मचिंतन करावे

प्रतिनिधी १ फेब्रुवारी

**अकोला:** महानगरपालिकेच्या महापौर-उपमहापौर पदाच्या निवडणुकीत भाजपाचे प्रदेश सरचिटणीस आमदार रणधीर सावरकर, खासदार अनुप धोत्रे यांच्या नेतृत्वात व महानगर निवडणूक प्रमुख विजयभाऊ अग्रवाल, महानगर अध्यक्ष जयंत मसने यांच्या मेहनतीने भारतीय जनता पार्टी, राष्ट्रवादी शरद पवार, राष्ट्रवादी अजित पवार., सुनील मेश्राम यांच्या नगरसेवकांच्या पाठिंब्यावर विजय मिळवला.

यानंतर गेल्या १५ दिवसांपासून अकोला महानगरातील जनादेशाचा अवमान करुन केवळ सत्तेसाठी विरोधकांची चिड-चिड करणारी पत्रकार परिषद झाली. यामध्ये पराभावाच्या शल्यातुन शिवसेना (उबाठा) ने भारतीय जनता पक्षाला हेच का हिंदुत्व हा प्रश्न केला? खरंतर हिंदुत्वाचा प्रश्न ज्यांनी विचारला त्यांनी स्वतःच्या पक्षाचे आत्मचिंतन करावे? ज्या सुषमा अंधारे यांनी हिंदु देव-देवतांचा कायम अपमान केला. त्यांना आपण पक्षाचे नेते केले! ज्या काँग्रेस सोबत जाण्याची वेळ आली तर मी माझा पक्ष बंद करेल असे सांगणा-या बाळासाहेबांच्या विचारांना सत्तेसाठी विसरले...! मगं तेव्हा तुमचं हिंदूत्व कुठं गेलं? कालपर्यंत भाजप-एमआयएमच्या कधीही न झालेल्या युती बद्दल चुकीचा प्रपोगंडा करणारे, लोकांची दिशाभूल करणारे महापौर-उपमहापौर निवडणूकीच्या मतदानाच्या दिवशी पर्यंत एम आय एम नेत्यांसोबत (नगरसेवकांसोबत) स्वतःच्या उमेदवारांना मते मिळवण्यासाठी बैठका घेत होते. तेव्हा कुठे गेल तुमचं हिंदूत्व?

अकोला शहरातील नागरिकांना भ्रमित करण्यासाठी चालवलेले राजकारण चुकीचे आहे. आमदार रणधीर सावरकर यांनी हिंदुत्वाची व्याख्या करतांना ठस्वधर्माचा अभिमान व इतर धर्मांचा आदरठ सांगितले आहे. मात्र सतत सत्तेसाठी जाती-धर्माचे राजकारण करणा-यांना भारतीय जनता पक्षाचे हिंदूत्व काय समजणार? अकोला शहरातील जनता सर्वच जाणते. अकोला शहरातील जनतेने आमदार सावरकर व खासदार अनुप धोत्रे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून भाजपाला जनादेश दिला आहे. जनादेशाचा आदर विरोधी पक्षांनी करावा असे मनीष गावंडे यांनी सध्या सुरू असलेल्या आरोप प्रत्यारोप विषयी सांगितले.

# जय भोलेनाथ मंदिरात शिव महापुराण कथेचे आयोजन

◆ संत कैलास बाबा आश्रमात कथा प्रवक्त्या वर्षा किशोरी देवी

प्रतिनिधी १ फेब्रुवारी

**अकोट:** अकोट ते दर्यापूर रोडवर असलेले श्री जय भोलेनाथ मंदिरात संगीतमय शिव महापुराण कथेचे आयोजन करण्यात आले आहे. आरंभ सोमवार दि.९/२/२०२६ तर सांगता सोमवार दि.१६/२/२०२६ या शिव महापुराण कथेची वेळ दुपारी १ ते ५ असून कथा प्रवक्त्या प.पू. सु. श्री वर्षा किशोरी देवी बैतूल (मध्यप्रदेश) ह्या आहेत. दैनंदिन कार्यक्रम पहाटे ५ ते ७ काकडा संध्याकाळी ७ ते ८ हरिपाठ यावेळी मुख्य यजमान अनिल पांडे सिंधुताई पांडे, प्रभुदास रोडे सौ पद्माताई रोडे, शरदचंद्र मुरेकार, सविताताई मुरेकार , गजानन भुस्कट शांताबाई भुस्कट, गजानन हाडोळे प्रतिभाताई हाडोळे, शालिनीताई मुरलीधर पवार हे राहणार आहेत. या शिव महापुराण कथेचे सप्ताहातील



अन्नदाता सोमवार ९ ला रामा काशीराम डोबाळे ताजनापूर, मंगळवार १० रामभाऊ अमृत पेटे सातेगाव ता. अंजनगाव, बुधवार ११ मुरलीधर जानराव शेंडोकार नंदीपेठ, गुरुवार १२ दशरथ नारायण हाडोळे नंदीपेठ, शुक्रवार १३ श्यामसुंदर आत्माराम बाळे नंदीपेठ, शनिवार १४ संतोष किसन ढोबाळे ताजनापूर, रविवार १५ गजानन मधुकर रेवस्कर मुंडगाव, या अन्नदानाची वेळ दुपारी १२ ते २ असून होम हवन विधी रविवार १५ ला सकाळी ८ ते १० ला मुख्य यजमान संतोष रमेश राऊत मंचनपूर, गजानन नारायण उतखडे टेंभा. जि.अमरावती, गजानन मधुकर रेवस्कर मुंडगाव, मनोज दशरथ हाडोळे मुंबई, नितीन ताकवले अकोला यांच्या उपस्थितीत पार पडेल, लगेच काल्याचे किर्तन सकाळी ९ ते १२ व महाप्रसाद १२ ते ५ पर्यंत राहील महाप्रसाद संत कैलास बाबा आश्रम ढगा यांच्याकडून सोमवार १६ ला राहील, सोमवार दि.१६ ला किसन भोंडे (साधू बुवा) व विशाल सारंगधर नाथे, मारुती संस्थान ढोलाचे भजन मंडळ सोमवार वेश आकोट, आसेगाव बाजार भजनी मंडळ, मंचनपूर भजनी मंडळ, मारुती संस्थान भजनी मंडळ बारगन अकोट, काळा मारुती संस्थान भजनी मंडळ देशपांडे वेताळ, सुधाकर गडम ढोलाचे भजनी मंडळ वडाळी सटवाई, ताजनापुर भजनी मंडळ, विटाळी सावरगाव भजनी मंडळ, नंदीपेठ भजनी मंडळ यांचे सर्व मंडळाचे सहकार्य मिरवणुकीमध्ये राहील, या सांप्रदायिक कार्यक्रमाला विशेष सहकार्य संजय शेंडोकार, सचिन काळे, निलेश पेटे, सुरज शंडोकार, प्रवीण शेंडोकार, दिलीप नाथे, सुनील काळे, जय भोलेनाथ मंदिर कैलास बाबा आश्रम ढगा हे मंदिर आकोट ते दर्यापूर रोडवर तीन किलोमीटर अंतरावर आहे या सर्व शिव महापुराण कथेला , मिरवणूक व महाप्रसादाला आवश्यक पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी उपस्थिती लावून लाभ घ्यावा असे आव्हान अध्यक्ष श्री संत कैलास बाबा यांनी केले आहे,

# अकोल्यात ३ फेब्रुवारी रोजी महफिल-ए-शब-ए-बरात चे आयोजन

प्रतिनिधी १ फेब्रुवारी

**अकोला:** कच्छी मशिद ट्रस्ट अकोलाच्या वतीने शब-ए-बरात या पवित्र प्रसंगी महफिल-ए-शब-ए-बरात आयोजित करण्यात येणार आहे. ही महफिल मंगळवार, ३ फेब्रुवारी रोजी कच्छी मशिद, अकोला येथे होणार आहे.

मगरीबच्या नमाजीनंतर इबादतीस सुरुवात होईल. यानंतर ६ रकात नफ्ल नमाज अदा केली जाणार असून, प्रत्येक २ रकातनंतर सुरह यासीन शरीफचे पठण करण्यात येईल. तसेच ईशा नमाजची जमाअत रात्री ९.१५ वाजता होणार आहे. ईशा नमाजीनंतर आयते करीमाचा वजिफा केला जाणार आहे. या पवित्र रात्री विशेष प्रवचनासाठी सुप्रसिद्ध धर्मगुरू हजरत अल्लामा व मौलाना अल्हाज मुफ्ती मोहम्मद सादिक अख्तर रझवी मर्कझी, किला खतीब व इमाम, कच्छी मशिद, अकोला उपस्थित राहणार आहेत. शब-ए-बरात ही इस्लाम धर्मातील अत्यंत महत्वाची रात्र मानली जाते. या रात्री इबादत, तौबा, इस्तेगफार आणि मगफिरतीला विशेष महत्त्व आहे. या पवित्र रात्री अल्लाह आपल्या बंद्यांच्या दुआ स्वीकारतात व त्यांच्या गुनाहांची माफी करतात, अशी धार्मिक श्रद्धा आहे. त्यामुळे मुस्लिम बांधव ही रात्र नमाज, कुरआन पठण आणि दुआमध्ये व्यतीत करतात.

या रात्री अनेक मुस्लिम बांधव कब्रस्तानला भेट देऊन आपल्या दिवंगत नातेवाईकांसाठी दुआ करतात. कब्रस्तानमध्ये फातिहा पठण करून मृत आत्म्यांसाठी मगफिरत व शांतीची प्रार्थना केली जाते. ही परंपरा मृत व्यक्तींप्रती आदर आणि अल्लाहकडे त्यांच्या आत्म्यांसाठी रहमत मागण्याची भावना दर्शवते.

ही महफिल कच्छी मशिद ट्रस्ट, अकोला यांच्या मार्गदर्शनाखाली होत असून, ट्रस्टच्या वतीने सर्व मुस्लिम बांधवांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या संदर्भातील माहिती कच्छी मशिदचे अध्यक्ष जावेद ज़करिया, मुतवल्ली एजाज सूर्या, नायब मुतवल्ली हाजी यासीन बचाव, सदस्य हाजी हनीफ मलक, हाजी फारूक भुराणी, हाजी इम्तियाज गणोदवाला तसेच जमातचे सचिव सलीम गाझी यांनी दिली.

# माता चैतन्य मीरा यांच्या भागवत कथेची सुदामा मिलनाने भक्तीभावात पूर्णाहुती

प्रतिनिधी १ फेब्रुवारी

**अकोला:** स्थानीय गोरक्षण रोड परिसरातील गोरक्षण संस्थान येथे सुरू असलेल्या पूज्य माता चैतन्य मीरा यांच्या श्रीमद् भागवत ज्ञानयज्ञ कथेचे शनिवारी सुदामा मिलन झाकी ने भक्तीभावात समापन झाले.श्री गोरक्षण संस्थान, भारतीय संस्कृति प्रचार परिषद आणि श्री भागवत सेवा समितीच्या संयुक्त विद्यमाने आयोजित माता चैतन्य मीरा यांनी दि २५ जानेवारी ते ३१ जानेवारी पर्यंत आयोजित आपल्या संगीतमय भागवत कथेत अनेक प्रसंग साकारत भागवताची महिमा विशद केली.आपल्या अंतिम सत्रात राधा कृष्णाची



झाकीमय कथा सांगितली.संपूर्ण कृष्ण चरित्र प्रतिपादित केल्यावर पूर्णाहुती दरम्यान सुदामा व द्वारकाधीश मिलनाची विरहयुक्त कथा सांगितली.या कथेत द्वारकाधीश व सुदामाची अति सुंदर झाकी सादर करण्यात आली.यावेळी या झाकीचे भव्य स्वागत करण्यात येऊन भाविकांनी झाकी दर्शन घेतले.यात कृष्णाची भूमिका सौ उर्वशी पियुष कुराणी यांनी तर रुक्मिणीची भूमिका मिताली राठी यांनी व सुदामाची भूमिका विजय खंडाळकर यांनी साकारली.यावेळी सुप्रभात सत्संग मंडळाने मातेचे स्वागत केले.योग फाउंडेशन ने प्रसाद वितरण सेवा सांभाळली.

# सरस्वती प्राथमिक व उच्च प्राथमिक विद्या मंदिर शाळेचे वार्षिक स्नेह संमेलन



प्रतिनिधी १ फेब्रुवारी

**हिवरखेड:** सरस्वती प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळेत वार्षिक स्नेह संमेलन साजरे झाले. यामध्ये चिमुकल्या बाल कलाकारांनी सहभाग नोंदविला. हे सप्तरंगी संमेलन पाहण्यासाठी गर्दी केली.

पालक, विद्यार्थी शिक्षक, सामाजिक क्षेत्रातील नामवंत लोकनेते यावेळी उपस्थितीत होते, व प्रथम सरस्वती मातेचे पूजन करून हे संमेलन पार पडले.आयोजन अतिशय सुंदर प्रकारे करण्यात आले होते.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
रविवार, दि. ०१ फेब्रुवारी २०२६ https://epaper.citynewssuperfast.com

# बनावट जन्म प्रमाणपत्र प्रकरणी एसआयटीची आढावा बैठक

## एसआयटी अध्यक्ष यशस्वी यादव यांनी दिले तपास अधिक व्यापक व सखोल करण्याचे निर्देश

प्रतिनिधी ०१ फेब्रुवारी

**यवतमाळ** : पोलीस स्टेशन यवतमाळ शहर येथे नोंद असलेल्या गंभीर गुन्हा क्रमांक 1043/2025 (BNS कलम 318(4), 337, 336(3), 340(2), 318(2), 339, 238, 61 तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनियम, 2000 चे कलम 65, 66, 66(C), 66(D)) च्या तपासासाठी स्थापन केलेल्या विशेष तपास समिती (SIT) ने आज पोलीस अधीक्षक कार्यालय, यवतमाळ येथे आढावा बैठक घेतली.

SIT चे अध्यक्ष यशस्वी यादव, अपर पोलीस महासंचालक, महाराष्ट्र सायबर, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. सदस्य म्हणून डॉ. बबिता कमलापुरकर, उपसंचालक आरोग्य सेवा (HIVS), पुणे आणि सदस्य सचिव डॉ. श्री सुभाष ढोले, जिल्हा आरोग्य अधिकारी, यवतमाळ उपस्थित होते. यशस्वी यादव यांनी स्पष्ट केले की, बनावट जन्म प्रमाणपत्रांची निर्मिती व वितरण हे फक्त आर्थिक मिळकतीसाठी नसून, त्यांचा वापर देशविरोधी, दहशतवादी किंवा राष्ट्राच्या सुरक्षेला बाधा पोहोचविणाऱ्या कारवायांसाठी होऊ शकतो. त्यांनी पुढे नमूद केले की, जन्म प्रमाणपत्र हे नागरिकत्व, पासपोर्ट, ओळखपत्र, शैक्षणिक कागदपत्रे आणि सरकारी योजना यांसारख्या मूलभूत दस्तऐवजांसाठी आवश्यक असून, अशा दस्तऐवजांचा गैरवापर गंभीर गुन्ह्यांसाठी केला जात असल्याचे प्रथम संकेत तपासात आढळले आहेत. बनावट जन्म प्रमाणपत्रांचा कोणत्या उद्देशासाठी वापर केला गेला देशविरोधी किंवा सुरक्षेला धोका निर्माण करणाऱ्या कारवायांमध्ये त्याचा वापर झाला आहे का बनावट कागदपत्रांवरून इतर ओळखपत्रे (आधार, पासपोर्ट, मतदान ओळखपत्र इ.) मिळविण्यात आली आहेत का, प्रकरणामागे संघटित व आंतरजिल्हा / आंतरराज्य नेटवर्क कार्यरत आहे का याची सखोल चौकशी होणार आहे. यशस्वी यादव यांनी SIT पथकास स्पष्ट निर्देश दिले की, संघटित स्वरूपात किंवा राष्ट्राच्या सुरक्षेला धोका पोहोचविणाऱ्या उद्देशाने हे कृत्य केले असल्यास, प्रचलित कायद्यांनुसार अत्यंत कठोर कारवाई करण्यात येईल. प्राथमिक तपासात मिळालेली महत्त्वाची माहिती यवतमाळ जिल्ह्यातील तपासात पुढील गोष्टी समोर आल्या: ग्रामपंचायत भवानी (यवतमाळ) आणि ग्रामपंचायत रताळे (जळगाव) येथे CRS पोर्टलचा गैरवापर करून बनावट जन्म प्रमाणपत्रे तयार केली गेली. आरोपींनी शासकीय CRS पोर्टलवर अनधिकृत प्रवेश मिळवून लॉग-इन क्रिडेन्शियल्सचा गैरवापर केला. बनावट प्रमाणपत्रांच्या निर्मितीसाठी वास्तविक नागरिकांचा डेटा (नाव, जन्मतारीख, पत्ता) गोळा करून PDF स्वरूपात वितरित केला. मोबाईल फोन, इंटरनेट, सोशल मीडिया



व डिजिटल पेमेंट माध्यमांचा वापर करून आर्थिक लाभ मिळवला. हा प्रकार संघटित स्वरूपात असून अनेक जिल्ह्यांमध्ये पसरलेला असल्याचे प्राथमिक तपासात संकेत मिळाले.

यावेळी कुमार चिंता, पोलीस अधीक्षक, अशोक थोरात, अपर पोलीस अधीक्षक, दिनेश बैसाणे, उपविभागीय पोलीस अधिकारी, विनायक खोत पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी, अमळनेर, जिल्हा जळगाव, आरोग्य विभागातून: डॉ. श्रीमती बबिता कमलापुरकर, उपसंचालक आरोग्य सेवा, पुणे, डॉ. सुभाष ढोले, जिल्हा आरोग्य अधिकारी व जिल्हा निबंधक जन्म-मृत्यू, यवतमाळ डॉ. क्रांतीकुमार नावंदीकर, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी, यवतमाळ, ऋषिकेश बगाडे, सांख्यिकी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ, अनिल पवार, सांख्यिकी विभाग, जिल्हा परिषद, यवतमाळ यावेळी उपस्थित होते.

**SIT ने तपास पथकाला दिले सखोल तपासाचे निर्देश**

सर्व आरोपींचे तांत्रिक पद्धतीने ट्रेसिंग करणे, बँक खाती, डिजिटल वॉलेट, UPI व्यवहार यांचे सखोल आर्थिक विश्लेषण करणे, गुन्ह्याचा कट, व्याप्ती व आंतरजिल्हा दुवे उघडकीस आणणे, संघटित स्वरूप असल्यास कायद्याने कठोर कारवाई करणे असे आदेश दिले.

**SIT ची शेंदुरसणी ग्रामपंचायतला भेट**

बैठकानंतर SIT अध्यक्ष श्री यशस्वी यादव यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष तपास पथकाने ग्रामपंचायत शेंदुरसणी येथे प्रत्यक्ष भेट देऊन CRS पोर्टलचा वापर, नोंदींची प्रक्रिया, दस्तऐवजांचे संधारण आणि शासकीय कार्यपद्धतीतील संभाव्य त्रुटी यांचा आढावा घेतला. SIT चे स्पष्ट संकेत आहेत की हा प्रकरण अत्यंत गंभीर असून, राज्य व देशाच्या सुरक्षेच्या दृष्टीने सर्वोच्च प्राधान्याने तपास सुरू आहे आणि दोषी आढळणाऱ्या सर्व व्यक्तींवर कायद्याने कठोर कारवाई केली जाईल.

# रेती वाहतूक करणाऱ्या टिप्परची दुचाकीला धडक, दोन युवक ठार

प्रतिनिधी ०१ फेब्रुवारी

**महागाव** : हिवरा संगम येथे शनिवारी दुपारी १ वाजताच्या सुमारास दुर्दैवी अपघात झाला, ज्यात दोन तरुणांचा जीव गेला. महागाव तालुक्यातील अंबोडा येथील १९ वर्षीय देवानंद दोडके आणि १८ वर्षीय शुभम पाटे हे दोघे पल्सर दुचाकीने माहुरकडे जात असताना भरधाव रेती वाहतूक करणाऱ्या टिप्परने त्यांना धडक दिली. धडकेत दुचाकी टिप्परमध्ये अडकली आणि पलटी येऊन रस्त्यालगत असलेल्या नालीत गेली.

या अपघातात देवानंद जागीच ठार झाला तर शुभम गंभीर जखमी झाला. त्याला उपचारासाठी माहुर शासकीय रुग्णालयात हलवले असता, पुढील उपचारासाठी यवतमाळ नेताना रस्त्यातच त्याचा मृत्यू झाला. दुचाकीच्या या धडकेत वाहन चुराडले गेले. अपघाताच्या ठिकाणी नागरिक आणि दुकानातील तरुणांनी धाव घेऊन जखमी शुभमला बाहेर काढले.

हिवरा संगम येथे प्रस्तावित बायपास अद्याप अपूर्ण आहे. महामार्ग प्राधिकरणाच्या उदासीन धोरणामुळे गावातील अरुंद रस्त्यावरून वाढती वाहतूक होत आहे, ज्यामुळे मागील तीन दिवसांत तीन बळी गेले आहेत. नागरिक संतप्त असून "बायपासचे काम सुरू करणे किती प्राणावर अवलंबून राहणार?" असा प्रश्न उपस्थित करत आहेत. ठाणेदार धनराज निळे, बिट जमादार विनोद जाधव, पोलीस उपनिरीक्षक किशोर गवई आणि इतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन





वाहतूक सुरळीत केली. मृतदेह पंचनामा करून सवना येथील ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आले. गावकऱ्यांनी मागणी केली होती की रस्त्यावर तातडीने गतिरोधक उभारावे. प्रशासनाने चार दिवसांत गतिरोधक तयार करण्याचे आश्वासन दिले असून, नागरिकांनी प्रतिक्षा न झाल्यास उग्र आंदोलनाचा इशारा दिला आहे. सामाजिक कार्यकर्ते हरीश कामारकर म्हणाले, "अपूरा बायपास आज जनतेसाठी 'मृत्यूचा सापळा' ठरला आहे. प्रशासनाचे उदासीन धोरण रस्ते विकासाच्या नावाखाली जनतेच्या जीवाशी खेळत आहे. आणखी किती बळी लागतील, हीच खरी विचार करण्याची वेळ आहे."

# जिल्हयातील अल्पसंख्यांक मुलींच्या वसतिगृहासाठी १ कोटी ६९ लाखांचा निधी

प्रतिनिधी ०१ फेब्रुवारी

**आर्णी** : यवतमाळ जिल्ह्यातील अल्पसंख्यांक समाजातील मुलींच्या वसतिगृहाच्या प्रलंबित दुरुस्ती कामासाठी सातत्याने पाठपुरावा करून १ कोटी ६९ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिल्याबद्दल माजी आमदार ख्वाजा बेग यांचा महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद अल्पसंख्यांक अधिकारी कर्मचारी संघटनेच्या वतीने भावपूर्ण सत्कार करण्यात आला.



वसतिगृहाच्या दुरुस्तीची अत्यंत गरज होती, कारण मुलींना सुरक्षित आणि योग्य शिक्षणासाठी सक्षम सुविधा उपलब्ध करणे आवश्यक होते. या मागणीवर लक्ष ठेवून ख्वाजा बेग यांनी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांमुळे मोठा निधी मंजूर झाला असून, आता वसतिगृहाचे काम पुन्हा सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

सत्कार सोहळ्यात संघटनेचे विदर्भ प्रमुख शेरु कदीर सैय्यद, प्रमुख पदाधिकारी नदीम नसीम पटेल, गुलमोहमद फानन, अलिमहमद भाटी, के.के. खान, लुकमानबेग मिर्झा, नासिर अली भाटी, शमसोद्दीन भाटी, अफरोज दुगे तसेच आंबेडकरी शिक्षक संघटनेचे राज्याध्यक्ष प्रशांत वंजारे उपस्थित होते. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी या प्रसंगी ख्वाजा बेग यांच्या सामाजिक बांधिलकीचे कौतुक केले आणि मुलींना शिक्षणाच्या सुविधांसाठी त्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांची दखल घेतली. ख्वाजा बेग म्हणाले, "समाजातील शेवटच्या घटकापर्यंत शिक्षणाची गंगा पोहचावी, यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहतो. भविष्यातही सर्व घटकातील जनतेसाठी रचनात्मक विकास आणि कामांसाठी कटिबद्ध राहू." त्यांच्या या सामाजिक बांधिलकीमुळे यवतमाळ जिल्ह्यातील अल्पसंख्यांक मुलींना शिक्षणाच्या योग्य सुविधांचा फायदा मिळणार आहे.

# श्री स्वामी समर्थ सामूहिक महाउपासना

प्रतिनिधी ०१ फेब्रुवारी

**यवतमाळ** : स्थानिक विवेकानंद विद्यालय यवतमाळ येथे श्री स्वामी समर्थ सामूहिक उपासना सेवा संस्था द्वारा आयोजित सामूहिक महा उपासनेचे आयोजन करण्यात आले नियोजित वेळी सायंकाळी पाच वाजता स्वामी समर्थांच्या पादुकांचे आगमन झाले आणि लगेच शंखनादाने अभिनव अशा सामूहिक उपासनेला सुरुवात झाली. स्वामींचे आणि दत्तात्रेयांचे दुर्मिळ स्तोत्र आणि मंत्र याचं सामूहिक संगीतमय पठण या उपासनेत करण्यात आलं. विद्यालयाचा संपूर्ण परिसर भक्तिमय सुरांनी भारावून गेला. दीड हजारापेक्षा जास्त स्वामीभक्त या उपासनेत सहभागी झाले होते. एकाच वेळी एवढ्या मोठ्या प्रमाणात उपासना होणं ही अनुभूती सर्व स्वामी भक्तांसाठी अविस्मरणीय होती. रंगमंचावर भव्य दिव्य स्वामींचे तैलचित्र साकारण्यात आले होते.

# प्रियंका हाटगडे मृत्यू प्रकरण; एफआयआर नोंदविण्याचे आदेश

प्रतिनिधी ०१ फेब्रुवारी

**पुसद**: बोरी खुर्द (ता. पुसद, जि. यवतमाळ) – पाच महिन्यांची गर्भवती प्रियंका हाटगडे यांचे हृदयद्रावक मृत्यू प्रकरण अखेर न्यायाच्या प्रकाशात आले आहे. अकोला येथील प्रथम वर्ग न्यायालयाने ठाम भूमिका घेत, एफआयआर नोंदवून प्रकरणाची नव्याने तपासणी करण्याचे आदेश दिले आहेत. प्रियंकाचे लग्न ३१ डिसेंबर २०२३ रोजी झाले. आनंदी संसाराची स्वप्ने घेऊन सासरी गेलेली ती काही महिन्यांतच हुंड्याच्या मागणी, मानसिक छळ आणि मारहाणीची



शिकार झाली. प्रियंकाने कुटुंबीयांना सांगितले की आरोपी तिला "मी पोलीस आहे, माझे कोणी काही करू शकत नाही" असे धमकावत होता. ४ ऑगस्ट २०२४ रोजी क्रूर मारहाणीत तिचा गर्भ मृत झाला आणि काही दिवसांत प्रियंकानेही प्राण सोडले. स्थानिक पोलिसांनी प्रकरण अपघाती मृत्यू म्हणून नोंदवण्याचा प्रयत्न केला, तर कुटुंबीयांनी न्यायालयात ठामपणे सांगितले की, "बाँडवर दिलेला जबाब आमचा नाही; तो बनावट आहे." या निर्णायक टप्प्यावर अर्जदाराच्या वतीने ॲड. आरिफ अहमद यांनी न्यायालयात अभ्यासपूर्ण आणि निर्भीड युक्तिवाद मांडला. वैद्यकीय अहवाल, पोस्टमार्टेम रिपोर्ट आणि जखमांचा तपशील यावरून न्यायालयाने मान्य केले की "घरात पडल्यामुळे संपूर्ण शरीरावर, पाठीवर, मानेवर व पोटावर जखमा होऊ शकत नाहीत." आरोपी पोलीस असल्यामुळे तपासात हस्तक्षेप होण्याची शक्यता नाकारता येत नाही, असेही न्यायालयाने स्पष्ट केले. न्यायालयाने एफआयआर नोंदवून तपास वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याकडे करण्याचे आदेश दिले असून, वरिष्ठ स्तरावरून तपासावर देखरेख ठेवण्याचे निर्देशही दिले आहेत. प्रियंका आज या जगात नाही, तिचा गर्भही या मातीत जन्म घेऊ शकला नाही, पण अकोला न्यायालयाच्या निर्भीड निर्णयामुळे तिचा आवाज दडला गेला नाही. बोरी खुर्दच्या रहिवाशांमध्ये आता "उशिरा का होईना, न्याय मिळाला" अशी भावना पसरली आहे.

# तंबाखुमुक्त शाळा कार्यक्रमाचे तालुकास्तरीय प्रशिक्षण

प्रतिनिधी ०१ फेब्रुवारी

**पुसद** : न. प. उर्दू हायस्कूल, पुसद येथे महाराष्ट्र शासन आणि सलाम फाऊंडेशन, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने तंबाखुमुक्त व आरोग्यसंपन्न शाळा कार्यक्रमाचे तालुकास्तरीय प्रशिक्षण यशस्वीपणे पार पडले.



प्रशिक्षणात गटशिक्षणाधिकारी, पं.स. पुसद यांनी तंबाखुमुक्त शाळांचे महत्त्व, विद्यार्थ्यांचे शारीरिक-मानसिक आरोग्य, तसेच सकारात्मक व सुरक्षित शालेय वातावरण निर्मितीवर सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमास सर्व विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख आणि बीआरसी पुसद टीम उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रकाश टेकाळे, रामभाऊ रोगे, भारत शेरे, लक्ष्मण वाघमारे, अनिता पावडे आणि दिलीप सारंगे यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. यापूर्वी तंबाखुमुक्त शाळा उपक्रमांतर्गत ऑफलाइन पद्धतीने निकषांची पूर्तता करून तपासणी केली जात असे आणि शाळेला प्रमाणपत्र दिले जात असे. मात्र आता नवीन प्रणालीत शाळांची ऑनलाइन नोंदणी केली जाणार असून, नऊ निकष ऑनलाइन पूर्ण करून संबंधित ॲपमध्ये अपलोड करणे आवश्यक आहे. निकष पूर्ण झाल्यानंतर सलाम बॉम्बे फाऊंडेशनमार्फत शाळेला पुढील दोन वर्षांसाठी तंबाखुमुक्त शाळा प्रमाणपत्र प्रदान केले जाईल. या प्रणालीमुळे प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक आणि परिणामकारक ठरणार असून तालुका शंभर टक्के तंबाखुमुक्त



परीक्षा परिसर करण्यास मोठी मदत होणार आहे. प्रशिक्षणामुळे शिक्षक आणि प्रशासनामध्ये तंबाखुमुक्त शाळा उपक्रमाबाबत जनजागृती निर्माण झाली असून, सर्वांनी सक्रिय सहभाग घेऊन हा उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्याचा संकल्प व्यक्त केला.

# जलतरण तलावाचे काम पूर्ण न केल्यास दंडात्मक कारवाई

प्रतिनिधी ०१ फेब्रुवारी

**यवतमाळ** : जिल्हा क्रीडा संकुल समितीअंतर्गत आझाद मैदान येथे सुरू असलेल्या जलतरण तलाव व संबंधित विकास कामांची जिल्हाधिकारी विकास मीना यांनी शुक्रवारी प्रत्यक्ष पाहणी केली. कामे विहित वेळेत पूर्ण न केल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येईल असा इशारा त्यांनी यावेळी दिला. यावेळी जिल्हा क्रीडा संकुल समितीच्या सचिव तथा जिल्हा क्रीडा अधिकारी शिल्पा चाबुसकवार, क्रीडा अधिकारी महेश पडोळे, शमहेश पडोळे, सचिन हरणे, मनीष डोळसकर, संकुलातील कर्मचारी तसेच जलतरण तलाव व कॅफिटेरिया बांधकामाचे कंत्राटदार उपस्थित होते.

# विडूळ येथे अवैध देशी दारू विक्रीवर कारवाई

## २४,८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त; एलसीबीची कारवाई

प्रतिनिधी ०१ फेब्रुवारी

**उमरखेड** : पोलीस स्टेशन उमरखेड हद्दीतील मौजे विडूळ येथे अवैध देशी दारू विक्री करणाऱ्या इसमाविरुद्ध स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने कारवाई केली आहे. या छाप्यात २४,८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दिनांक ३० जानेवारी २०२६ रोजी मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने मौजे विडूळ येथील दिपक केंद्रेकर (वय ५६, रा. विडूळ, ता. उमरखेड) यांच्या दुकानाच्या पाठीमागील जागेवर छापा टाकला. यावेळी त्याच्याकडून १८० मि.ली. क्षमतेच्या देशी दारूच्या ३१० बाटल्या जप्त करण्यात आल्या. पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई



यशस्वीपणे पार पडली. पथकात अशोक थोरात, हनुमंत गायकवाड, सतिश चवरे, धिरज बांडे, शरद लोहकरे, मुन्ना आडे, संतोष भोरगे आदी उपस्थित होते. या प्रकरणी आरोपीविरुद्ध पोलीस स्टेशन उमरखेड येथे महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५(ई) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीसांनी म्हटले की अवैध दारूच्या कारवाईसाठी गोपनीय माहिती मिळाल्यानंतर लगेच पथकाने छापा टाकून दारू जप्त केली. स्थानिक पोलिसांनी नागरिकांना अवैध दारू विक्रीबाबत खबरदारी घेण्याचे आवाहन केले असून, अशा प्रकारच्या कारवायांमधून समाजातील नियमांचे पालन सुनिश्चित करण्याचा प्रयत्न सुरू ठेवला जात आहे.

# आदिवासी समाजातील अनिष्ठ चालीरुढी पार पाडण्यासाठी शिक्षण आवश्यक

## दशरथ मडावी यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी ०१ फेब्रुवारी

**उमरखेड** : आदिवासी समाजाच्या विकासासाठी शिक्षण अत्यंत गरजेचे आहे, असे प्रतिपादन भिल्ल नाईकवाडा आदिवासी समाज संघटना यवतमाळ व नांदेडच्या वतीने आयोजित कुटवा महोत्सव (जमात पंचायत) कार्यक्रमात बिरसा क्रांती दलाचे संस्थापक अध्यक्ष दशहरथ मडावी यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शन माजी प्राचार्य डॉ. वि. ना. कदम यांनी केले. त्यांनी आदिवासी समाजातील अंधश्रद्धा, अनिष्ट चालीरुढी, पारंपरिक भाषा, पोशाख आणि राहणीमान यांचा उल्लेख करत सांगितले की, या अनुष्ठित प्रथांवर मात करण्यासाठी समाजाच्या युवकांनी शिक्षणाचा मार्ग अवलंबावा आणि व्यवसायिक जीवनात स्वतः सक्षम व्हावे. फक्त शिक्षणाच्या जोरावरच आदिवासी समाजाचा खरा विकास होऊ शकतो, असे ते म्हणाले.

कार्यक्रमात डॉ. वि. ना. कदम यांनी कै. परशराम पिलवंड यांच्या जीवनचरित्रावर प्रकाश टाकला. त्यांनी सांगितले की, आदिवासी समाजाने अंधश्रद्धा सोडून विकासाच्या वाटेवर पाऊल टाकावे. याशिवाय सखाराम तिळेवाड यांनी कुटव्याची माहिती सविस्तर दिली.

यावेळी नारायणराव पिलवंड, दतात्रय गडमवाड, दिंगाबर यलकेवाड, सुनिल साखरे, विष्णु



कोवे, रामदास धबडगावकर आणि विष्णु होलगरे हे प्रमुख उपस्थित होते. आर्णी कार्यक्रमाचे प्रास्ताविक के. डी. पिटलेवाड यांनी केले. संचालन सुधाकर मितकवाड यांनी केले, तर आभार प्रदीप परमेटवाड यांनी मानले.

दशरथ मडावी म्हणाले की, "समाजातील युवकांनी शिक्षण मिळवून आपल्या समाजातील अनिष्ट प्रथांवर मात केली तरच आदिवासी समाज प्रगतीशील होईल. व्यवसाय आणि शिक्षणाच्या माध्यमातून युवक सक्षम होतील आणि समाजाचा विकास घडेल." मागील ३०-३५ वर्षांनंतर यावर्षी प्रथमच कुटव्याचे आयोजन करण्यात आले, ज्यामुळे आदिवासी समाजाच्या युवकांना एकत्र येऊन सामाजिक आणि सांस्कृतिक विचारांची देवाणघेवाण करण्याची संधी मिळाली.

# स्व. अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली

प्रतिनिधी ०१ फेब्रुवारी

**पुसद**: महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अकाली निधनानंतर पुसद येथे सर्वपक्षीय श्रद्धांजली सभेचे आयोजन करण्यात आले. राधाकृष्ण मंगल कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमाचे अध्यक्षत्व राष्ट्रवादी काँग्रेसचे राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांनी केले.

या सभेला विविध पक्षांचे नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये सदाबाराव मोहटे, विश्वास भवरे, प्रा. सुरेश धनवे, रेश्मा लोखंडे, खान मोहम्मद खान (सनी), जैनुलभाई सिद्दिकी, उमाकांत पापिनवार, विनोद जिलेवार, शरद मैंद, दीपक आसेगावकर, लक्ष्मण कांबळे, मोहन विश्वकर्मा, आरती ताई



फुफाटे आणि डॉ. मोहम्मद नदीम यांसह अनेक ज्येष्ठ नेते सहभागी झाले. उपस्थितांनी अजितदादांच्या प्रतिमेसमोर पुष्पांजली अर्पण करून त्यांच्या कार्याची आणि व्यक्तिमत्वाची आठवण साजरी केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. संजय चव्हाण यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. नरेंद्र जाधव यांनी केले. भावुकतेतून बोलत राज्यमंत्री इंद्रनील नाईक म्हणाले, "माझे मार्गदर्शक हरपले आहेत. स्पष्ट वक्ते, अनुभवी आणि लोकनेतृत्व असलेला नेता महाराष्ट्राने गमावला आहे. अजितदादा आता आपल्यात नाहीत, यावर अजूनही विश्वास बसत नाही." सर्वपक्षीय उपस्थितीमुळे या श्रद्धांजली सभेला विशेष महत्त्व प्राप्त झाले. महाराष्ट्राच्या राजकारणातील एका मोठ्या नेत्याच्या अकाली निधनामुळे निर्माण झालेल्या शोकभावनेचे प्रतिबिंब या सभेत पाहायला मिळाले. या कार्यक्रमातून राजकीय विरोधाभासांना बाजूला ठेवून नेत्यांच्या योगदानाला व मानाला सर्वांनी एकत्रितपणे सलाम केला.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

रविवार दि.१ फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## उद्या जिल्हाधिकारी कार्यालयात लोकशाहीदिन



**वाशीम :** जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन दि. २ फेब्रुवारी रोजी दुपारी १ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील राजे वाकाटक सभागृहात करण्यात आले आहे. दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हा लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रतीसह जोडलेले अर्ज सादर करावे. महिन्यातील तिसऱ्या सोमवारी तालुका स्तरावर लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. त्यामध्ये अर्जाचे निराकरण न झाल्यास जिल्हास्तरीय लोकशाही दिनामध्ये अर्ज सादर करावा. तसेच अर्ज दाखल करतेवेळी तालुकास्तरीय लोकशाही दिनात अर्ज दाखल केल्याची पोच जिल्हास्तरीय लोकशाही दिनामध्ये सादर करावी. याशिवाय संबंधित अर्ज स्विकारले जाणार नाही याची संबंधितांनी नोंद घ्यावी, असे निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे यांनी कळविले आहे.

# कामात दिरंगाई अन् भ्रष्टाचाराचे अवलंबन...

# १८ कर्मचाऱ्यांचे होणार निलंबन !

## कृषी विभागतील 'दोषीं' कर्मचाऱ्यांवर कारवाईची टांगती तलवार कायम

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

**सन २०२३-२४ मधील दुष्काळी निधी वाटपात झालेल्या भ्रष्टाचारापासून जिल्ह्यात अनेक घोटाळे चव्हाट्यावर येत आहेत. पोकरा भाग एक या योजनेतील गैरप्रकाराने तर वाशिम जिल्हा संपूर्ण राज्यात गाजत आहे. त्यातच कर्तव्यात कसूर करत अनेक शेतकऱ्यांना वेठीस धरणाऱ्या कृषी विभागतील १६ ते १८ कर्मचारी दोषीं ठरले आहेत. त्या सर्व दोषींवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. मात्र आर्थिक देवाण - घेवाण करून दोषीं कर्मचाऱ्यांची पाठराखण केली जात असल्यचा संशय व्यक्त केला जात आहे. परंतु कितीही पाठराखण केली तरी कर्तव्यातील कसूर अखेर भोवणार आणि कारवाई निश्चितच होणार ! अशी विश्वसनीय माहिती एका वरिष्ठ अधिकाऱ्यांनी नाव न छापण्याच्या अटीवर दिली आहे. परिणामी 'त्या' सर्व दोषीं कर्मचाऱ्यांवरील निलंबनाची टांगती तलवार कायम असल्याची माहिती समोर येत आहे.**






***कर्तव्यात कसूर..**
***भ्रष्टाचार भरपूर..**
***कारवाईपासून दूर..**
***मॅनेजचा सूर..!**

नैसर्गिक संकटाचा सामना करता करता राज्यातील शेतकरी मेटाकुटीस आला आहे. तर काही भागात सातत्याने गारपीट, अतिवृष्टी तर कधी कोरडा दुष्काळ तर कधी हातात आलेले उभी पिके महापुरात वाहून गेली आहेत.परिणामी उत्पन्नाऐवजी शेतकरी कर्जबाजारी झाले आहेत. आर्थिक संकटात सापडलेल्या अनेक अन्नदात्यांनी गळफास आवळून आपली जीवनयात्रा संपवली आहे. यात वाशिम जिल्हा अग्रस्थानी असून एक आकांक्षित जिल्हा म्हणून घोषित आहे. त्यामुळे केंद्र शासन असो अथवा राज्य शासनाच्या कृषी विषयक विविध योजनेत वाशिम जिल्ह्याचा प्राधान्याने समावेश करण्यात येतो. जेणेकरून जिल्ह्यातील आर्थिकदृष्ट्या हतबल झालेल्या शेतकऱ्यांना योजनांचा लाभ देऊन शाश्वत उत्पन्नाची हमी मिळेल. या स्तुत्य हेतूने कृषी विभागांतर्गत अनेक योजना राबविण्यात येत आहेत. त्यात नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प अर्थात पोकरा योजना ही खुप महत्वाकांक्षी योजना आहे. या योजनेचा पहिला टप्पा सन २०२५ मध्ये संपुष्टात आला असून सन २०२६ दुसरा टप्पा सुरू झाला आहे. मात्र पहिल्या टप्प्यात कृषी विभागाच्या काही कमिशनखोर अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी या महत्वाकांक्षी योजनेची वाट लावली आहे. त्यात काही दलाल शेतकऱ्यांनी हातभार लावत योजनेचा बट्ट्याबोळ केला आहे. ठराविक काही टक्के कमिशन मिळत असल्याने गावपातळीवरील कर्मचाऱ्यांनी आर्थिक लोभापायी एकाच कुटुंबात वेगवेगळ्या नावांवर लाखों रुपयांचे अनुदान वितरित केले आहे. तर काही अडाणी शेतकऱ्यांच्या अज्ञानपणाचा फायदा घेत बोगस अनुदान हडपले आहे. तर काही ठिकाणी सामूहिक लाभाच्या घटकात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाले आहेत. परिणामी शासनाच्या स्तुत्य हेतुला 'खो' देत भ्रष्ट व्यवस्थेने शेतकऱ्यांच्या नावावर स्वतःच्या आर्थिक तुंबड्या भरून घेतल्या आहेत. या बाबत अनेक तक्रारी समोर येत असून काही तक्रारी थेट वरिष्ठ स्तरांवर करण्यात आल्या आहेत. वाशिम जिल्ह्यातील रिसोड तालुक्यात येत असलेल्या शेलुखडसे येथील पोकरा योजनेची तक्रार राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यापर्यंत पोहचली आहे. या गंभीर प्रकाराची चौकशी करण्यासाठी तपास अधिकारी नेमून प्राथमिक तपासणी पार पडली आहे. मात्र यात कारवाई काय झाली ? हा प्रश्न अद्यापही गुलदस्त्यातच आहे.

वरिष्ठांकडे अहवाल पाठविला असल्याची माहिती सबंधित तपास अधिकारी यांच्याकडून मिळत आहे. परंतु पुढील कारवाई किती दिवसाच्या कालावधीत होणार याची माहिती अद्यापही स्पष्ट झालेली नाही. त्यातच कामातील दिरंगाई, भ्रष्टाचार आणि गैरप्रकरणी कृषी विभागाच्या अनेक कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई झालेली आहे. परंतु सदर कारवाई प्रलंबित असल्याने भ्रष्ट कर्मचारी चांगलेच शेफारले आहेत. आमचे कोणीही काहीही वाकडे करू शकत नाही! या आविर्भावात 'ये रे माझ्या मागल्या' या म्हणी प्रमाणे सदर दोषी कर्मचाऱ्यांचा स्वैराचार सुरूच आहे. ही बाब पुढील शासकीय योजना राबविण्यासाठी धोकादायक ठरणारी आहे. या गंभीर प्रकाराची वरिष्ठांकडून तातडीने दखल घेत दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी सर्व सामान्य नागरिक करीत आहेत.


'पोकरा' योजनेत घोटाळा, फसवेगिरीतून पैसा केला गोळा !
*अनुदान लाटण्यासाठी 'बोगस' बिले सादर * रिसोड तालुक्यात काम अपूर्ण, अनुदान घेतले पूर्ण *पोकरातील सावळागोंधळ चव्हाट्यावर
सरकारी जागेतील अतिक्रमित विहीर खाजगी सात- बारावरून हटावा
खाजगी व सरकारी जमिनीतील घुसखोरी थांबवा !
गुरूवार दि.२१ ऑगस्ट २०२५
कृषी सहायकाची मर्जी, अनुदान वाटप फर्जी !
अधिकारी मेहरबान, कर्मचारी पहेलवान
रविवार दि.२४ ऑगस्ट २०२५
कृषी अधिकाऱ्यांची भ्रष्ट निती, कामाची कागदावरच गती...
कुपनानेच खाल्ली शेती, योजनेची मार्त
पोखराला पोखरले, भ्रष्टाचाराने घेरले...
अधिकाऱ्यांची भ्रष्टनीती, कुंपनानेच खाली शेती...
त्यांचं कुत्रं काशीला..
पोकरा योजनेची माती !
* पोखरा योजनेमधील भ्रष्टाचाराची कसून चौकशी गरज * साहित्य खरेदीतील अनेक गैरप्रकार येणार चव्हाट्यावर
अर्थपूर्ण संबंधातून वाढली मुजोरी,
गावठाण हद्दीत घुसखोरी !
जिल्ह्यातील पोकरा घोटाळ्याची एसआयटी नेमून सखोल चौकशी करा !
शेतकऱ्यांच्या हक्काचा मलिदा लाट नाऱ्यांवर तात्काळ कारवाई करा
*अन्यथा विधान भवनासमोर आंदोलन छेडण्यात येईल *किसान कॉंग्रेसचा ईशारा
कामात दिरंगाई, भ्रष्टाचार आणि गैरप्रकरणी...
अनेक कर्मचारी निलंबित, मात्र कारवाई प्रलंबित !
*कृषी विभागतील १६ कर्मचाऱ्यांवर, कारवाईची टांगती तलवार * बातमी बिंतबित, कारवाई होणार निश्चित
चौकशीचा केवळ फार्स नको, तर दोषींवर कारवाई करा- शेतकऱ्यांची मागणी
कर्तव्यातील कसूर भोवणार,
कारवाई निश्चित होणार !
कृषी विभागतील 'दोषीं' कर्मचाऱ्यांवर कारवाईची टांगती तलवार कायम

## थोडक्यात

### भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सव समितीची गठीत




●सिटी न्युज ब्युरो @ कारंजा●

दरवर्षी प्रमाणे या वर्षीही अहिंसेचे पुजारी श्री १००८ भगवान महावीर जन्मकल्याणक महोत्सव उत्साहात साजरा करण्याचे ठरविले असून महोत्सव अधिक प्रभावी रीत्या व नियोजनबद्ध साजरा व्हावा म्हणून नुकतीच २०१६ साठी महोत्सव समितीची नवीन कार्यकारिणी गठीत करण्यात आली असून अध्यक्ष म्हणून नितीन बुरसे तर सचिव म्हणून ?ड संदेश जिंतुरकर यांची समाजाच्या भगवान महावीर चौक स्थित अहिंसा भवनात आयोजित सभेत सर्वानुमते अविरोध निवड करण्यात आली.

यावेळी उपाध्यक्ष प्रज्वल गुलालकरी, प्रफुल्ल चिनके,सहसचिव नविन डांगुर, कोषाध्यक्ष स्वप्नील गुलालकरी, सहकोषाध्यक्ष शिशिर कस्तुरीवाले तर मार्गदर्शक म्हणून भारत हरसुले,निरंजन वैद्य,दिलीप उन्होने, राजुभाऊ खंडारे,फड धनंजय डाखोरे, प्रसन्ना आग्रेकर,हितेंद्र गंधक, निनाद बन्नोरे,आनंद चवरे,नितीन चढार, धनंजय राऊळ,सतीष भेलांडे,विजय जिंतुरकर संतोष दगडे तसेच सदस्य म्हणून शुभम राऊळ,निष्कलंक वैद्य, दिलीप आग्रेकर,पारस गहाणकरी, दर्शन वैद्य,कौशल बंड, पारस खंडारे,अक्षय हनुमंते,तुषार घाटे, सर्वार्थ वैद्य,अर्पित गरीबे,सिध्देश नांदगावकर, प्रांजल दर्यापुरकर, आशिष गुलालकरी, दिप क्षीरसागर, संकेत फुलाडी,मंदार जोहरापुरकर व मंदिर प्रतिनिधी म्हणून विनम्र चवरे, पियुष डोणगावकर, अविन नांदगावकर, सन्मती दर्यापुरकर, विद्याधर रोडे, उज्वल रायबागकर तसेच महिला प्रतिनिधी म्हणून पद्माताई नखाते, रंजनाताई वाडेकर, वंदनाताई मोहाळे,चित्राताई मिश्रीकोटकर,मयुरी गंधक,गीता डांगुर, मिनल राऊळ,श्रद्धा जैन, अनुषा वैद्य, सोनल रुईवाले,प्रसिद्ध प्रमुख म्हणून प्रफुल्ल बांनगावकर व मनिष भेलांडे आदींचा समावेश करण्यात आला आहे.

### मूकनायक पत्रकार दिन साजरा



●सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर●

मंगरुळपीर येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक परिसरात १०६ वा मूकनायक डॉ.बाबासाहेब आंबेडकर पत्रकार दिन ता ३१ रोजी दुपारी एका वाजता उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष अशोक परळीकर प्रमुख पाहुणे म्हणून सुधाकर चौधरी रमेश मुंजे आदी मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमात पत्रकार रमेश मुंजे ,नाना देवळे ,नारायण आव्हाळे संदीप कांबळे ,राजकुमार ठाकुर ,सुधाकर क्षीरसागर,,सुधाकर चौधरी ,अमोल ठाकुर ,गोपाल खिराडे,सुनिल भगत ,वसंत इंगोले ,फुलचंद भगत , सामाजिक कार्यकर्ते फकीरा श्रृंगारे,सुदाम मनवर ,प्रेमकुमार इंगोले ,उत्तम भगत आदींची उपस्थिती होती.कार्यक्रमाचे संचालन पत्रकार संदीप कांबळे यांनी केले तर आभार पत्रकार सुधाकर चौधरी यांनी मानले.

## तातपूर्ती अतिक्रमण हटाव मोहिम...

### नगर पालिकेचा आला गाडा, गरिबांचे झोपडे मोडा...

# रस्त्यावरचे काढा, अन् पक्केही पाडा !

**कायम स्वरूपी अतिक्रमण हटवून श्रीमंतांचे पक्के अतिक्रमण काढण्याची शहर वासीयांची मागणी**

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

पाच दिवसापूर्वी नगर पालिकेच्या वतीने सिव्हील लाईन परिसरातील डॉ. देशमुख यांच्या दवाखाण्याजवळ अतिक्रमण हटाव मोहिम तातपूर्ती राबविण्यात आली. कायमस्वरूपी अतिक्रमण हटाव मोहिम राबवून रस्त्यावरील अतिक्रमण काढा मात्र श्रीमंतांचे पक्के अतिक्रमण पाडा अशी मागणी शहरवासीयांकडून होत आहे.नाहीतर नगर पालिकेचा आला गाडा गरीबांचे झोपडे मोडा अशी म्हणण्याची वेळ येईल.

वाशीम शहर अतिक्रमणामुळे व अस्वच्छतेमुळे भकास झाले आहे. शहरातील रस्त्यांना अतिक्रमणाने घेरले असून त्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत होता. तर अस्वच्छतेने नागरिक त्रस्त झाले आहे. रस्त्यावरील अतिक्रमण हटाव मोहिमेनंतर कायम स्वरूपी शहरातील पक्के अतिक्रमण पाडण्याची मागणी शहर वासियांकडून होत आहे. अतिक्रमण हटाव मोहिम ही नेहमी सारखी न राबविता कायम स्वरूपी राबवावी. कारण हे अतिक्रमण धारक पुन्हा काही दिवसानंतर जैसे थे करीत पुन्हा अतिक्रमण करतात.

रस्त्यावरील अतिक्रमण न काढता पार्कींगच्या जागेवर केलेले पक्के अतिक्रमण, सरकारी जागेवर केलेले पक्के अतिक्रमण कायम स्वयंमस्वरूपी काढण्याची मागणी होत आहे.

**अनेक वेळा राबविण्यात येते अतिक्रमण हटाव मोहिम...**

शहराला अतिक्रमणच्या विळाख्यातून बाहेर काढण्यासाठी अतिक्रमण हटाव मोहिम या पुर्वी ही अनेक वेळा राबविण्यात आली. मात्र अतिक्रमण हटविल्यानंतर काही दिवसातच पुन्हा जैसे थे परिस्थिती होते. अतिक्रमणामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. त्यामुळे कायम स्वरूपी अतिक्रमण हटाव मोहिम राबवून श्रीमंतांचे पक्के अतिक्रमण पाडण्याची मागणी होते.

**पक्के अवैध बांधकाम पाडा, शहरवासियांची मागणी...**



शहरात अतिक्रमण हटाव मोहिम सुरू असून त्यामध्ये रस्त्यावरील अतिक्रमण काढण्यात येत आहे. ही बाब शहर वासीयांच्या दृष्टीने अभिमानास पद असून अधिकाऱ्यांनी शहरातील पक्के अतिक्रमण पाडावे, कारण शहरात अनेक धनधागड्यांनी नगर पालिकेच्या जागेवर पक्के अतिक्रमण केले आहे. ते काढावे जेणे करून गरीब श्रीमंत असा भेदभाव होणार नाही. सर्वांना कायद्यानुसार समान न्याय मिळेल. शहरातील पार्कींगच्या जागा मोकळ्या कराव्या अशी मागणी जनतेतून होत आहे.

## चेहल येथे अजित दादांना भावपूर्ण श्रद्धांजली

●सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर●

मंगरूळपीर तालुक्यातील चेहल येथे सामाजिक संस्था शाखा कार्यालय मध्ये छोट्या खाणी बैठकीचे आयोजन करून महाराष्ट्राचे लाडके उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री , शिस्तप्रिय नेते मा. अजित दादा पवार यांचे विमान अपघातात निधन झाले . ही अत्यंत दुःखद न भरून निघणारी हानी आहे. असून महाराष्ट्र हा पोरका झाला आहे.

म्हणून सामाजिक संस्था चेहेल च्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली. वाहून त्यांच्या कार्याला उजाळा देण्यात आला. यावेळी . सामाजिक



संस्थेचे दिनेश पाटील चौधरी. माजी. पंचायत समिती सदस्य व संजय गांधी निराधार योजना सदस्य युनुस गफार खान. माजी. उपसरपंच प्रदीप पाटील चौधरी. प्रगतिशील शेतकरी गोपाल विलासराव चौधरी, त्र्यंबक पाटील. भाऊराव चौधरी. गोपाल चौधरी. प्रगतिशील शेतकरी गणेश पाटील. बालाराम पाटील सह इतर नागरिक उपस्थित होते.

## हजरत काकड शाह बाबा यांचा संदल शरीफ साजरा !

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

वाशीम शहरातील हजरत काकड शाह बाबा दर्ग्यावर यंदाचा वार्षिक संदल शरीफ मोठ्या भक्तिभावात व उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने दर्गा परिसरात सकाळपासूनच भाविकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. पारंपरिक पद्धतीने काकड शाह बाबा यांच्या दर्ग्यावर फुलांची उधळण करत चादर अर्पण करण्यात आली. दरवर्षी प्रमाणे यंदाही वाशीम येथील हजरत काकड शाह बाबा यांचा संदल शरीफ मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आलं. संदल शरीफ





कार्यक्रमामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला होता.काकड शाह बाबा यांच्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला होतं. दरम्यान भाविकांनी दर्ग्यावर हजेरी लावत सुख-समृद्धी, आरोग्य व शांततेसाठी प्रार्थना केली.

या पवित्र प्रसंगी दर्गा परिसरात आरेफ खान खुर्शीद खान यांच्याकडून महाप्रसादाचे देखील आयोजन करण्यात आले होते. महाप्रसादाचा लाभ घेण्यासाठी भाविकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.संदल शरीफ सोहळ्यावेळी शिवसेना (उबाठा)पक्षाचे जिल्हा प्रमुख सुरेश मापारी, नगरसेवक शेख रशीद( नूर भाई), नितीन मडके, सोनू काळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. विशेष म्हणजे या धार्मिक सोहळ्यात हिंदू-मुस्लिम बांधवांनी एकत्र येत सामाजिक ऐक्य व सलोख्याचे दर्शन घडवले. अशा धार्मिक कार्यक्रमांमुळे समाजात एकोप्याचा संदेश जात असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# पाणी फाउंडेशनचे निवासी प्रशिक्षण !

●सिटी न्युज ब्युरो @ रिसोड●

वाशिम जिल्ह्यातील रिसोड तालुक्यातील कृषी विभाग व उमेद अभियान महिला, शेतकरी, यांचे पाणी फाउंडेशनच्या माध्यमातून तीन दिवसीय निवासी प्रशिक्षण अकोला जिल्ह्यातील डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला या ठिकाणी खेळीमेळीच्या, उत्साही, आनंददायी वातावरणात पार पडले. संपूर्ण महाराष्ट्रात ३५१ तालुक्यातील शेतकरी बांधवांसाठी पाणी फाउंडेशनच्या गट शेती चळवळीच्या माध्यमातून २०२६ यावर्षी गट शेती फार्मर कप स्पर्धेचे नियोजन करण्यात आले आहे.

यासाठी राज्यस्तरीय पुरस्कार बक्षीसे, तसेच जिल्हास्तरावरील बक्षीस देण्यात येणार आहेत या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी सुरुवातीला शेतकऱ्यांना तीन दिवसाचे निवासी मोफत प्रशिक्षण कृषी विभाग, उमेद अभियान व पाणी फाउंडेशनच्या माध्यमातून देण्यात येत आहे. असे प्रशिक्षण २८ जानेवारी ते ३०/ २०२६ या कालावधीत रिसोड तालुक्यातील ४०पुरुष शेतकरी व ३०महिला शेतकरी यांना एसटी बसच्या माध्यमातून प्रवाशाची सोय करून देण्यात आली.





डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला, या ठिकाणी तीन दिवसीय निवासी प्रशिक्षणात शेतकऱ्यांना पूर्व मशागती पासून काढणी मळणी पर्यंत चा प्रवास करून गटाच्या माध्यमातून कमी खर्चात आर्थिक उत्पादन घेऊन आपले आर्थिक उत्पन्न कसे मिळवाल यासाठी अत्यंत तळमळीने प्रशिक्षकांची सोप्या भाषेत सोप्या पद्धतीने वेळेचे पालन वेळेवर केल्यास आपले उत्पादन कसे वाढेल यासाठी आवश्यक ते प्रात्यक्षिक करून प्रशिक्षण दिले. समाजामध्ये जीवन जगत असताना मन साधनातून सामाजिक बांधिलकी जोपासत सामाजिक कार्य, सहकार्य कसे करावे व जीवनाचा आनंद कसा घ्यावा.

दीर्घगुणित करावे हे आम्हाला समजले व कधीही न संपणारी ज्ञानाची शिदोरी घेऊन आम्ही आमच्या गावी प्रेरणादायी उत्साहाने पोहोचलो ते तालुक्यातील गावागावात गट शेतीचे रोपे लावण्यासाठी यासाठी कृषी विभाग, उमेद अभियान,पाणी फाउंडेशनचे विभागीय व्यवस्थापक उज्वल बोलवार सर, रूपाली गावंडे, जीवन गावंडे, सिद्धार्थ कवडे, अनुराधा घोरळ, मनीषा राठोड, अश्विनी शिरसाट, महादेव निपाने, प्रतीक तिडके, कृषी विभाग व उमेद विभाग,आणि पाणी फाउंडेशन ची टीम व आरिफ शहा सर वाशिम जिल्हा कृषीअधिकारी, यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

## वाशीम मुद्रक संघाची नवीन कार्यकारिणी सर्वानुमते निवड

●सिटी न्युज ब्युरो @ वाशीम●

वाशिम मुद्रक संघाच्या मागील तिन वर्षाच्या कार्यकारीनीने सर्व लेखा जोखा (हिशोब) दि.२६/१२/२०२५ च्या बैठकीत मांडला त्याला सर्वानी अनुमती देऊन पुर्णविराम देत वाशिम मुद्रक संघाची नविन कार्यकारणी स्थापन करण्याचा निर्णय घेतला व नविन कार्यकारीनी स्थापन करण्यात आली.

त्यामध्ये सर्वानुमते प्रदिप गोटे यांची अध्यक्ष म्हणुन, चंदन बरेटी उपाध्यक्ष, गोपाल दांदडे सचिव व नितीन गणमुखे कोषाध्यक्ष यांची निवड करण्यात आली. तसेच कार्यकारी सदस्य म्हणुन प्रविण वर्मा, अजय पांडे, रतन बरेटी, किशोर इढोळे, प्रकाश डाहोरे, राहुल विभुते, जितेश भंडारी, प्रसिध्दी प्रमुख- कलपेश महाजन , सल्लागार-मनोज बकाले यांची निवड करण्यात आली.

या सभेला कल्पेश महाजन, प्रकाश डाहोरे, विनोद काळे, राम महाल्ले, अजय पांडे, चंदन बरेटी, सतिष कोकणे, प्रकाश धामाणी, विरू जयस्वाल, प्रदिप पेंढारकर, अमोल भांडेकर, सुधिर शहाणे, पांडुरंग भोयर, सय्यद नुर, रतन बरेटी, राहुल विभुते, विजय कोकाटे, समीर शेख, गोपाल दांदडे तसेच अक्षय पट्टेबहादुर, अरविंद पिंजरकर, ज्ञानेश्वर गवळीसर, अक्रम मिर्जा ईत्यादी व सर्व मुद्रक बांधव उपस्थित होते. माजी अध्यक्ष मनोज बकाले यांच्या हस्ते सर्व नविन कार्यरीणीचे पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले आणि चहा पाणी घेऊन बैठकीची सांगता करण्यात आली.

कार्यकरी सदस्य श्री. प्रविन वर्मा यांनी सर्व उपस्थित मुद्रक बांधवांचे आभार मानले तसेच नितीन गणमुखे यांनी मिटींग करीता जागा उपलब्ध करून दिल्या बद्दल त्यांचे सुध्दा आभार मानले.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
रविवार, दि.१ फेब्रुवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

# पहाटेच्या ताज्या हवेत फिटनेसचा जल्लोष !

## ■ 'द फिटनेस हब'च्या सायकलिंग इव्हेंटला अकोलेकरांचा विक्रमी प्रतिसाद; आरोग्याच्या मंत्राने दुमदुमले रस्ते

प्रतिनिधी १ फेब्रुवारी

**अकोला :** शहरातील आरोग्याच्या चळवळीला नवे बळ देत, 'द फिटनेस हब' तर्फे आयोजित सायकलिंग इव्हेंटने अकोल्यात उत्सवाचे वातावरण निर्माण केले. पहाटेच्या आल्हाददायक वातावरणात, शेकडो फिटनेसप्रेमींनी आपल्या सायकलवर स्वार होत 'आरोग्य हीच संपत्ती' हा संदेश केवळ दिलाच नाही, तर तो कृतीतून सिद्ध करून दाखवला. सहकार नगर येथील पेट्रोल पंपाजवळील 'द फिटनेस हब' येथून या भव्य रॅलीचा प्रारंभ झाला.



सकाळी ठीक ६:३० वाजता या मोहिमेला सुरुवात झाली. आयोजकांनी केलेल्या काटेकोर आणि सूक्ष्म नियोजनामुळे हा इव्हेंट अत्यंत शिस्तबद्धरीतीने पार पडला. पहाटेची वेळ असल्याने वाहतुकीचा अडथळा नव्हता, त्यामुळे मोकळ्या रस्त्यांवर सायकलिंग करताना सहभागींचा उत्साह गगनाला भिडला होता. निसर्गाच्या सानिध्यात आणि शुद्ध हवेत सायकलिंगचा हा अविस्मरणीय अनुभव प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आनंद देऊन गेला.या रॅलीचे विशेष आकर्षण म्हणजे यात केवळ तरुणच नव्हे, तर महिला, लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांनीही खांद्याला खांदा लावून सहभाग नोंदवला. ही केवळ एक रॅली नसून ती अकोलेकरांच्या फिटनेसप्रती असलेल्या जिद्दीचे दर्शन घडवणारी एक प्रेरणादायी चळवळ ठरली. नियमित व्यायाम आणि सायकलिंग हे निरोगी आयुष्याचे अविभाज्य अंग आहे, हा विचार या उपक्रमातून अधिक प्रबळ झाला. हा भव्य उपक्रम यशस्वी करण्यासाठी 'द फिटनेस हब'च्या टीमने अहोरात्र कष्ट घेतले. यामध्ये मॅनेजर संकेत सावरकर, दीपक मिश्रा, प्रशांत वाहुरवाघ, गौरव चेचरे, करण रणपीसे, अमित खंडारे, शंतनु बनसोड, नितेश थोरात, अभिजित वानखडे, अभिजित दोनडे, अनिकेत अटलकर, वैभव गवई, अजय गवई, अनुज शर्मा, सौरभ पोहनकर आणि योगेश भाटिया यांनी मोलाचे योगदान देत नियोजनाची धुरा सांभाळली.कार्यक्रमाच्या सांगतेवेळी आयोजकांनी सर्व सहभागींचे आभार मानले आणि भविष्यातही अशाच प्रकारचे समाजहितोपयोगी आणि आरोग्यदायी उपक्रम राबवण्याचा संकल्प व्यक्त केला. सहभागी सायकलस्वारांच्या मते, 'अशा उपक्रमांमुळे शहरात एक सकारात्मक ऊर्जेचे संचलन होते.'

# शहरात विविध कार्यक्रमांनी साजरा होणार गजानन प्रगटोत्सव

## ♦ आज पासून अनेक मंदिरात गजानन महाराज पारायण आणि श्रीमद् भागवत कथेचे आयोजन

प्रतिनिधी १ फेब्रुवारी

**अकोला :** शहरात संत श्री गजानन महाराज प्रगटोस्तव तसेच महाशिवरात्रिस घेऊन भक्तांमध्ये मोठा उत्साह पहावयास मिळत आहे. आज एक फेब्रुवारीपासूनच शहरातील गजानन मंदिरांमध्ये विविध धार्मिक कार्यक्रमांना सुरुवात झाली आहे ८ फेब्रुवारी रोजी या सर्व धार्मिक कार्यक्रमांची सांगता महाराजांच्या प्रकटोस्तवाने होणार आहे शहरातील सर्वच गजानन महाराज मंदिरांमध्ये विविध धार्मिक कार्यक्रमांची तयारी अंतिम टप्प्यात आहे. कौलखेड डाबर रोड, जठार पेठ मोठी उमरी लहान उमरी रामदास पेठ गोरक्षण रोड खदान परिसरातील अनेक मंदिरांमध्ये १ ते ८ फेब्रुवारी दरम्यान संगीतमय श्रीमद्भागवत कथा होणार आहे. तर अकोट शहरातील श्रद्धा सागर येथे गजानन महाराजांच्या जीवनावर आधारित नाटिकेचे आयोजन करण्यात आले आहे, या सर्व कार्यक्रमाचे सफल आयोजन करण्यासाठी मंदिराचे विश्वस्त आणि भक्त परिवार अथक परिश्रम घेत आहेत. सर्व मंदिर व्यवस्थापन तर्फे भाविकांना प्रकाटोत्सव कार्यक्रमात सहभागी होऊन पुण्य प्राप्त करण्याचे आवाहन केले आहे. अनेक मंदिरात भाविकांनी श्री गजानन विजय ग्रंथाचे पारायण करण्यास सुरुवात केली आहे ८ फेब्रुवारी नंतर शहरात सर्वत्र महाप्रसादांची धूम उडणार आहे त्यासाठी आतापासूनच आयोजन करण्यात आले आहे शहरातील अनेक गजानन महाराज मंदिरांसमोर मंडप उभारण्यात आले आहेत आतापासूनच स्वयंपाकासाठी आचारी बुक करण्यात आले आहेत एकूणच शहरातील वातावरण श्रींच्या प्रगटोस्तवानिमित्त धार्मिक झाल्याचे दिसून येत आहे.



### महाशिवरात्रीची तयारीही सुरू झाली आहे.

◆श्री राजराजेश्वर नगरीत संतश्री गजानन महाराज प्रकटोत्सव व महाशिवरात्रीनिमित्त भाविकांमध्ये प्रचंड उत्साह आहे शहरातील श्री राज राजेश्वर मंदिरा सोबतच अन्य शिव मंदिरांची सजावट केली जात असतानाच महाशिवरात्रीनिमित्त विविध कार्यक्रमांचे नियोजन केले जात आहे शहरातील बारा ज्योतिर्लिंग मंदिर जागेश्वर मंदिर नर्मदेश्वर मंदिर विश्वेश्वर महादेव मंदिरातही विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे उज्जैन महाकाल प्रमाणेच शहरातील श्रीराज राजेश्वर मंदिरात शिवरात्री साजरी केली जाते सायंकाळी भव्य आरती होते आणि रात्री श्रीराज राजेश्वर महाराजांची आकर्षक सेज सजवली जाते शहरातील शिव मंदिरांमध्ये सात ते १७ फेब्रुवारी दरम्यान महाशिवरात्री उत्सव होणार आहे सर्व भाविकांनी यांचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे

# गर्भवती पत्नीच्या हत्येप्रकरणी पोलीस कर्मचाऱ्याला अटक

प्रतिनिधी १ फेब्रुवारी

**अकोला :** गर्भवती पत्नीला मारहाण करून तिच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्या प्रकरणी सिटी कोतवाली पोलीस ठाण्यातील कर्मचारी देवानंद हताकाळे याच्यावर हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. न्यायालयाने या प्रकरणी आरोपी पोलीस कर्मचाऱ्याला चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणात इतर दोन महिला आरोपींचा पोलिस शोध घेत आहे.

सन २०२४ मध्ये आरोपी देवानंद हताकाळे याने त्याच्या गर्भवती पत्नीला बेदम मारहाण केली होती. या मारहाणीनंतर दोन दिवसांनी संबंधित महिलेचा मृत्यू झाला होता. सुरुवातीला सिटी कोतवाली पोलीस ठाण्यात याप्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली होती. मात्र, शवविच्छेदन अहवालात महिलेला झालेल्या मारहाणीमुळेच तिचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले. मृत महिला गर्भवती असतानाही तिला अमानुष मारहाण करण्यात आल्याचे समोर आल्यानंतर हे प्रकरण न्यायालयात पोहोचले. न्यायालयाने या प्रकरणाची गंभीर दखल घेत अकोला पोलिसांना संबंधित कर्मचाऱ्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले. न्यायालयाच्या या आदेशानुसार सिटी कोतवाली पोलिसांनी हत्येचा गुन्हा दाखल करून आरोपी देवानंद हताकाळे याला अटक केली. न्यायालयाने त्याला चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणातील इतर दोन महिला आरोपींचा शोध पोलिस घेत आहे. अशी माहिती प्राप्त झाली आहे.

# जड वाहनांमुळे शहरातील रहदारी विस्कळीत

प्रतिनिधी १ फेब्रुवारी

**अकोला :** शहरात मुख्य बाजारपेठेतून जड वाहने ये जा करीत असल्याने रहदारीची समस्या अधिक बिकट झाली आहे. अतिक्रमण प्रश्न आधीच भेडसावत आहे. यातून मार्ग काढावा अशी मागणी केली जात आहे. वाहतूक शाखेने अशा वाहनांना आळा घालावा अशी मागणी केली जात आहे. जड वाहनांमुळे शहरातील वाहतूक व्यवस्था बिघडत चालली आहे. एकीकडे वाहतूक व्यवस्थित करण्यासाठी चौकाचौकात सिग्नल लावले जात आहे. आणि दुसरीकडे वर्दळीच्या वेळी जड वाहने खोळंबा करीत आहेत. याला आळा घालण्यासाठी वाहतूक शाखेने पुढाकार घ्यावा. कारण सद्यस्थितीत नागरिकांची प्रचंड गैरसोय होत आहे. नियमबाह्य वाहन चालकांच्या विरुद्ध कारवाई करण्यात यावी अशी मागणी होत आहे. तसेच नागरिकांमध्ये संताप व्यक्त केला जातो आहे.

# महाराष्ट्राचा आधारवड गेला : माजी मंत्री सुभाषराव ठाकरे

प्रतिनिधी १ फेब्रुवारी

**मंगरूळपीर :** सांस्कृतिक भवन मध्ये उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना सर्वपक्षीय सामूहिक श्रद्धांजली वाहण्यात आली. दादांच्या अकाली निधनाने महाराष्ट्राचा आधारवड गेला अशी शोकसंवेदना माजी मंत्री सुभाषराव ठाकरे यांनी व्यक्त केली.



शोकसभेत सर्व राजकीय पक्ष, संघटनेच्या वतीने सामूहिक श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी बोलताना माजी राज्यमंत्री सुभाषराव ठाकरे म्हणाले, अजितदादा यांचा ४० वर्षाचा प्रदीर्घ राजकीय अनुभव, वाशिमच्या विकासात अजित दादांची भूमिका निर्णायक राहिली. दादांच्या निधनाने राज्याचे कधीही न भरून निघणारे नुकसान झाले. राज्यात लाडकी बहीण योजना सुरू करण्यात त्यांचा मोठा वाटा होता. वक्तशीरपणा, शेतकरी व सर्वसामान्य जनतेच्या समस्या निकाली काढण्यासाठी त्यांचे असलेले प्रयत्न,स्पष्ट वक्तेपणा आदी बाबी त्यांच्याकडून शिकण्यासारख्या आहेत.तर अजितदादांच्या निधनाने राज्याचा कोहिनूर हिरा कायमचा सोडून गेल्याने राज्याच्या राजकारणात पोकळी निर्माण झाल्याचे आ. शाम खोडे यांनी सांगितले. तर वाशीम जिल्ह्याच्या विकासात अजितदादांचा मोठा वाटा असून विरोध असतानासुद्धा वाशीम जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी त्यांनी २०२ दश लक्ष घन मीटर पाणी उपलब्ध करून दिल्याने माननीय अजितदादानी वाशिम जिल्ह्याला दिलेल्या भेटीची फल श्रुती म्हणून वाशिम जिल्ह्याचे रब्बी पिकाचे क्षेत्रामध्ये ९००० हेक्टर असून ३०२५ -२६ च्या रब्बी हंगामामध्ये गहू पिकाच्या पेरणी क्षेत्रामध्ये ८००० हेक्टरने वाढ झाली आहे, असे राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष चंद्रकांत ठाकरे यांनी सांगितले. तर अजित दादांच्या निधनावर अद्यापही विश्वास बसत नसून मी केवळ नगरसेवक असताना त्यांनी शहराच्या पाणी पुरवठा योजनेसाठी साठ लाख रुपयांचा निधी मंजूर केला होता असे नगराध्यक्ष अशोक परळीकर यांनी सांगितले.

यावेळी भाजपचे जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम चितलांगे, सुनील मालपाणी, ?ड. प्रकाशराव इंगोले, मेहताब पटेल,पत्रकार सुभाष हातोलकर,ओमप्रकाश बंग,रामदास सुर्वे . प्राचार्य डॉ. राहुल सुर्वे आदींनी मनोगत व्यक्त करून श्रद्धांजली वाहिली. शोकसभेचे संचालन प्रा.कावरे यांनी केले.यावेळी मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# अकोल्यात सोमवारी महानिर्यात परिषद, उद्योजकांसाठी सुवर्णसंधी

प्रतिनिधी १ फेब्रुवारी

**अकोला :** राज्याच्या आर्थिक विकासात लघु, सूक्ष्म उद्योग क्षेत्राचे योगदान वाढवण्यासाठी आणि निर्यातक्षम उद्योगांना चालना देण्यासाठी जिल्हा उद्योग केंद्रातर्फे अकोल्यात 'महानिर्यात परिषद २०२६' जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या अध्यक्षतेत सोमवार, २ फेब्रुवारी रोजी सकाळी १० वाजता हॉटेल आर.जी. एक्सक्लुझिव्ह येथे होणार आहे.

या कार्यक्रमात व्यवसाय सुलभीकरणासाठी 'मैत्री विभाग' , निर्यातीसाठी, भांडवलासाठी व इतर बाबींसाठी आयडीबीआय, सिडबी यासारख्या संस्थांचे तज्ज्ञ मार्गदर्शन करतील. विशेष उपस्थिती: कृषी व खाद्य उत्पादने निर्यातीसाठी अपेडा आणि उत्पादनांच्या विम्यासाठी एनआयए अशा विविध संस्थांचे प्रतिनिधी आणि यशस्वी उद्योजक यावेळी उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. विकास आयुक्त (उद्योग) यांच्या मार्गदर्शनात परिषद आयोजित करण्यात आली आहे. अकोला जिल्ह्यातील सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम घटक, निर्यातदार, नवउद्योजक, औद्योगिक संस्था, शेतकरी सहकारी संस्था आणि बँकांचे प्रतिनिधी यांनी या कार्यशाळेला उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक संतोष बनसोड यांनी केले आहे. उद्योजकांना आपल्या उत्पादनांना जागतिक बाजारपेठ मिळवून देण्यासाठी आणि विविध शासकीय योजनांचा लाभ एकाच छताखाली घेण्यासाठी ही कार्यशाळा अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे.

# बसंती चांडक रिलीफ फाउंडेशनचा नेत्र आरोग्यासाठी स्तुत्य उपक्रम

## ♦ ३० जानेवारीपासून डोळ्यांची तपासणी, रुग्णास मोफत चष्मा फ्रेम

प्रतिनिधी १ फेब्रुवारी

**अकोला :** नागरिकांच्या नेत्र आरोग्याची काळजी घेण्याच्या उद्देशाने रामदास पेठेतील बसंती नेत्र हॉस्पिटलच्या वतीने एक अभिनव सामाजिक उपक्रम राबविण्यात येत आहे. ३० जानेवारीपासून डोळ्यांची तपासणी करणाऱ्या प्रत्येक रुग्णास दररोज चष्याची फ्रेम मोफत देण्यात येणार आहे. या उपक्रमाचे उद्घाटन बसंती चांडक रिलीफ फाउंडेशन ट्रस्टच्या मॅनेजिंग डायरेक्टर सौ. वंदना मेहता यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ट्रस्टी श्याम चांडक, रमाकांत खेतान व हीरक मेहता हेही प्रामुख्याने उपस्थित होते.

बसंती चांडक रिलीफ फाउंडेशन ट्रस्टची स्थापना सन १९८८ मध्ये झाली. या ट्रस्टला ३८ वर्षे पूर्ण होत आहेत. गेल्या



३८ वर्षांपासून हा ट्रस्ट आरोग्य, समाजसेवा व मानवतावादी उपक्रमांच्या माध्यमातून सातत्याने उल्लेखनीय कार्य करत आहे. ट्रस्टच्या ३८ व्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून नेत्र आरोग्य उपक्रम हाती घेण्यात आला आहे. मोफत चष्मा फ्रेम उपक्रमाचा लाभ विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक तसेच सर्वसामान्य नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन बसंती हॉस्पिटल प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. वाढत्या डोळ्यांच्या समस्या लक्षात घेता वेळेवर तपासणी व उपचार मिळावेत, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे. रामदास पेठ येथे कार्यरत असलेले बसंती हॉस्पिटल नेत्र हॉस्पिटल हे अकोल्यातील विश्वासार्ह नेत्ररोग उपचार केंद्र म्हणून ओळखले जाते.

या उपक्रमामुळे अनेक गरजू रुग्णांना मोठा दिलासा मिळणार आहे.अधिक माहितीसाठी नागरिकांनी ०७२४-२४११७११ / २४४४८६३ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन बसंती हॉस्पिटल व अकोला नेत्र रूग्णालयाचे व्यवस्थापक विजयकुमार मुंदडा व बसंती हॉस्पिटल रिलीफ फाउंडेशन ट्रस्ट तर्फे करण्यात आले आहे.

# घरगुती गॅसचा वाहनांमध्ये अवैध वापर

## ♦ ३५ लाखांचे साहित्य घटनास्थळावरून जप्त

प्रतिनिधी १ फेब्रुवारी

**अकोला :** घरगुती गॅस सिलिंडरचा वाहनांमध्ये अवैधपणे वापर केला जात असल्याची माहिती मिळताच, जिल्हा पुरवठा विभाग आणि जिल्हा गुन्हे शाखेच्या पथकाने संयुक्तरीत्या छापा टाकला. या कारवाईत वीस हून अधिक सिलिंडर, वजनकाटे, तीन रिक्षा आणि इतर साहित्य जप्त करण्यात आले आहे.

शहरातील वाशिम बायपास परिसरात एक व्यक्ती घरगुती गॅस सिलिंडरमधून वाहनांमध्ये अवैधपणे गॅस भरून विक्री करत असल्याची माहिती जिल्हा पुरवठा विभागाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे जिल्हा पुरवठा अधिकारी रवींद्र येनावार, पुरवठा निरीक्षक रामेश्वर भोपाळे, योगेश सातव, राष्ट्रपाल वाहुरवाघ, पोलीस कॉन्स्टेबल आणि पंचांच्या पथकाने हॉटेल दिल्ली दरबारच्या मागील परिसरात धाड टाकली. घटनेच्या ठिकाणी दोन ऑटो रिक्षा आढळून आल्या, जिथे एक व्यक्ती टिल्लू पंपाच्या साहाय्याने रिक्षात गॅस भरताना रंगेहात सापडली. या कारवाईत आठ घरगुती सिलिंडर, पाच किलोचे दोन रिकामे सिलिंडर, चार टिल्लू मशीन, दोन वजनकाटे आणि दोन रिक्षा जप्त करण्यात आल्या.

# केंद्रीय अर्थसंकल्पात कहीं खुशी कहीं गम



प्रतिनिधी १ फेब्रुवारी

**अकोला :** केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पाबाबत विविध घटक आतून संमिश्र प्रतिक्रिया उमटल्या आहेत. काहींनी स्वागत तर काहींनी निराशा व्यक्त केली आहे.

### अर्थसंकल्पात नोकरवर्गाची घोर निराशा

मागील वर्षी आयकरात मोठा दिलासा दिल्यानंतर यंदाच्या केंद्रीय अर्थसंकल्पात,आयकरात कोणताही बदल न झाल्याने सर्वसामान्याच्या पदरी निराशाच आली. आर्थिक वाढीला चालना देण्यासाठी कर स्लॅबमध्ये अधिक सवलत अपेक्षित होती, तसेच पगारदार वर्गांना वाढीव मानक वजावटीची आशा होती. पण आयकरात बदल न झाल्याने, सर्वसामान्याच्या खिशात अधिक पैसा खेळणार नाही, त्यामूळे बाजारात मागणी वाढण्याची शक्यता कमी राहील.आयकर भरण्याची प्रक्रिया अधिक सोपी करणार आहे. कर चोरी किंवा अघोषित संपत्तीसाठी आता शिक्षेच्या ऐवजी फक्त दंड आकारण्यात येणार आहे.



५ लाख लोकसंख्या असलेल्या शहरांचा पायाभूत सुविधांचा विकास करण्याच्या मानस अर्थसंकल्पात जाहीर करण्यात आला. त्याचा फायदा अकोला शहराला निश्चितच होऊ शकतो.

**डॉ.संजय खडक्कार,** माजी तज्ज्ञ सदस्य, विदर्भ वैधानिक विकास मंडळ.

### अर्थ संकल्पात मोठे बदल नाही

केंद्रीय अर्थसंकल्पात मोठे बदल दिसत नाही. रिवाईज रिटर्न दाखल करण्याची मर्यादा ३१ डिसेंबर ऐवजी मार्च पर्यंत वाढवली आहे. मात्र, त्यासाठी फी द्यावी लागेल. सामान्यांना दिलासा म्हणजे १२ लाखापर्यंत कर लागणार नाही. तसेच अर्थ संकल्पातील तरतुदीमुळे पायाभूत सुविधा वाढीस चालना मिळेल.

**किशोर महाजन,** चार्टर्ड अकाउंटंट

### कर रचना सोपी करण्याचा प्रयत्न

केंद्रीय अर्थमंत्र्यांनी कर रचना सोपी करण्याचा प्रयत्न केला आहे. तसेच १२ लाखापर्यंत करात सुट दिली असल्याने त्याचा लाभ नोकरदार वर्गाला होईल. परंतु वरिष्ठांसाठी तरतूद दिसत नाही. अर्थात पूर्ण अर्थसंकल्प समोर आल्यावर उलगडा होऊ शकतो.

**प्रा. व्ही. एल. देशपांडे,** अकोला

### कोरडवाहू शेतकऱ्यांसाठी काहीही नाही

देशातील कृषी क्षेत्राचा विचार केला तर सोयाबीन, कापूस, धान, मका, गहू, ऊस, मोहरी या पिकांना केंद्रस्थानी ठेवावे लागते. परंतु ते सोडून चंदनाला प्राधान्य दिले जात असेल तर शेतकऱ्यांसोबत बेईमानी आहे. छोट्या, कोरडवाहू शेतकऱ्यांची घोर निराशा केली आहे. पिलर्स ऑफ ग्रोथ म्हणून ज्याचा उल्लेख करण्यात आला आहे दुर्दैवाने कृषी क्षेत्राचा त्यात कुठेच उल्लेख नाही. या वरुन केंद्र शासनाचे कृषी विषयक व्हीजन किती तकलादू आहे हे दिसुन येते.

**प्रशांत गावंडे,** कृषी विषयक अभ्यासक

### शेतकऱ्यांना समर्पित अर्थसंकल्प

शेतकऱ्यांना समर्पित तसेच ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूती तसेच मातृ शक्तीला प्रेरणा देणारे बजेट अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सादर केले. सुजलाम सुफलाम भारताचे स्वप्न साकार होईल.

**आमदार रणधीर सावरकर**

### प्रत्येकाचे कल्याण करणारा अर्थसंकल्प

राष्ट्र विकास सोबतच प्रत्येकाच्या कल्याणाचा विचार करणारा अर्थसंकल्प आहे. समाजातील प्रत्येक घटकांना समाविष्ट केले आहे.

**खासदार अनुप धोत्रे**

### मध्यम वर्गीयांना प्राधान्य देणारा

मातृशक्ती शेतकरी कामगार, मध्यमवर्गीय यांचा विचार करून बजेट सादर करण्यात आला आहे यामुळे देशाच्या आर्थिक सोबत सामाजिक आर्थिक व ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत होईल.

**आमदार हरीश पिंपळे**

### मुलभूत सोईसुविधांचा विचार

आरोग्य सुविधा, मूलभूत सुविधा सोबत विमा योजना तसेच रेल्वे सुविधा मध्ये वाढ करण्याचा निर्णय घेऊन कामगार ,मच्छीमार, मध्यमवर्गीय यांना समर्पित बजेट.

**आमदार प्रकाश भारसाकळे**

### मध्यम उद्योजकांसाठी उपयुक्त

मध्यम उद्योजकांना लक्षात घेऊन स्वदेशी वस्तूची विक्री तसेच शेतकऱ्यांच्या हितार्थ अनेक पिकांसाठी तरतूद करून ग्रामीण आणि शहरी विकासाचा समतोल सोबत सामाजिक दायित्व म्हणून बजेट सादर केले.

**आमदार वसंत खंडेलवाल**

भाजप जिल्हाध्यक्ष संतोष शिवरकर, महानगर अध्यक्ष जयंत मसने, माजी महापौर विजय अग्रवाल, किशोर पाटील, तेजराव थोरात, जयश्रीताई पुंडकर, योगेश गोतमारे, वसंत बाछुका, निकेश गुप्ता, आशिष चांदराणा , माधव मानकर, सिद्धार्थ शर्मा, डॉ. अभय जैन, एडवोकेट सुभाष सिंग ठाकूर, डॉ. किशोर मालोकार यांनी सुद्धा बजेटचे स्वागत केले आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 /49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK